रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I वर्ष ८९ I अंक २१५ I पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ११ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

## भाजपच्या स्वीकृत नगरसेवकाचा राजीनामा

**बदलापूर :** बदलापूर येथील शैक्षणिक संस्थेचे सचिव तुषार आपटे यांना भाजपनं स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिली होती. यानंतर भाजपवर चहूबाजूंनी टीका झाली. दोन वर्षांपूर्वी राज्याला हादरवणाऱ्या बदलापूर शहरातील दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार झाला होता. आपटे त्या प्रकरणातील सहआरोपी आहेत. जामिनावर सुटका झालेल्या आपटेला स्वीकृत नगरसेवक पदी संधी दिल्यानं भाजपवर टीका झाली. यानंतर आपटे यांनी नगरसेवकपदाचा राजीनामा दिला आहे. कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेत शुक्रवारी झालेल्या स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीत भाजपच्या दोन, शिवसेनेच्या दोन, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका सदस्याची निवड करण्यात आली होती.


गार्डनमध्ये काम करण्यासाठी अपंग व्यक्ती व महिला पाहिजेत

शिक्षित महिला पाहिजेत.
पात्रता – B.com, Computer

अर्जासह भेटा साई-इन रिसॉर्ट, चोंढी, रेवस रोड, अलिबाग


# संविधान वाचविण्याची गरज

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे प्रतिपादन




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

देशाचे राजकारण सध्या चुकीच्या दिशेने सुरू असून, संविधानावर घाला घातला जात आहे. त्यामुळे संविधान वाचविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले. अलिबाग तालुक्यातील चोंढी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

स्वर्गीय मधुकर ठाकूर यांचे चिरंजीव राजाभाऊ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. ९) हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत राजाभाऊ ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, "दिवंगत मधुकर ठाकूर कधीही टक्केवारीत अडकले नाहीत. त्यांच्यात नम्रता आणि जनतेशी नातं जपण्याची वृत्ती होती. त्यांचा वारसा पुढे चालविण्यासाठी राजाभाऊ निश्चितच योग्य आहेत. मात्र, राजकीय निर्णय हा येथील जनता आणि ठाकूर कुटुंबाने घ्यायचा आहे." निवडणुकीत कुठलाही दगाफटका होणार नाही, याची जबाबदारी महाविकास आघाडीची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना महेंद्र घरत म्हणाले, "मधुकर ठाकूर यांचे कार्य अलिबाग परिसराला परिचित आहे. समाजसेवा हाच त्यांच्या कुटुंबाचा पिंड आहे. त्यांचा राजकीय आणि सामाजिक वारसा पुढे नेण्यासाठी राजाभाऊ ठाकूर यांनी जिल्हा परिषदेतून राजकीय श्रीगणेशा करावा. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ ठाकूरच असतील," असे त्यांनी जाहीर केले.

सत्काराला उत्तर देताना राजाभाऊ ठाकूर म्हणाले, "पप्पांचे काम अलिबागच्या जनतेला माहिती आहे. त्यांनी स्वीकारलेला सामाजिक वसा पुढे नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. दिबांचे नाव आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागलेच पाहिजे, यासाठी रस्त्यावर उतरायलाही आम्ही तयार आहोत. अलिबागच्या वाहतूक कोंडीवर ठोस उपाययोजना करण्यासाठी संघर्ष करू." ठाकूर कुटुंबावर जनतेने कायम प्रेम केले असून, पुढेही भक्कम साथ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास सुनील थळे, समीर ठाकूर, प्रशांत नाईक, आल्हाद पाटील, सुनील घरत, रवींद्र ठाकूर, भास्कर चव्हाण, आकाश राणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पप्पांच्या कार्याचा गौरव

दिवंगत आमदार मधुकर ठाकूर (पप्पा) यांनी राजकारणात कधीही तडजोडीचे किंवा टक्केवारीचे राजकारण केले नाही. त्यांच्या नम्र स्वभावामुळेच ते जनतेच्या मनात राहिले, असे गौरवोद्गार जयंत पाटील यांनी काढले.



● अभिनेते प्रशांत दामले यांचा पीएनपी सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील, ज्येष्ठ कलाकार संदीप गोठीवडेकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित रसिकप्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात प्रशांत दामले यांना मानवंदना दिली. सविस्तर वृत्त पान ३ वर.

## जिल्हाधिकाऱ्यांची जेएसडब्ल्यूला तंबी

### उच्चदाब वाहिन्यांचे मनोरे उभारण्यास स्थगिती



**। पेण । प्रतिनिधी ।**

कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय जेएसडब्ल्यू कंपनीच्या ४०० के.व्ही. भारवाढीसाठी उभारण्यात येणाऱ्या उच्चदाब पारेशन वाहिन्यांचे मनोरे तसेच संबंधित कोणतेही काम पुढे नेऊ नये, असा ठाम आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला आहे.

२२० के.व्ही. नागोठणे एसपीसीएल वाहिनीच्या तारा (कंडक्टर) बदलण्याचे काम तसेच जेएसडब्ल्यू कंपनीला ४०० के. व्ही. विद्युत पुरवठा करण्यासाठी प्रस्तावित •➤ पान २ वर

## ठाकरेंची तोफ आज धडाडणार

**मुंबई :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची उद्या रविवार, दि. ११ जानेवारी रोजी शिवतीर्थावर (छत्रपती शिवाजी महाराज पार्क) संयुक्त सभा होणार आहे. या महत्त्वपूर्ण सभेची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही सभा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कारण मुंबईमध्ये ठाकरे बंधूंची ही पहिलीच संयुक्त जाहीर सभा आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या सभेकडे लागले आहे.










# आदिवासींची फसवणूक करून जमिनीचे हस्तांतरण

**■ आदिवासी शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन**

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वस्ती करून आहे. या आदिवासी समाजाच्या जमिनीचे आदिवासी व्यक्तीला हस्तांतरण होत नाही.मात्र कर्जत तालुक्यात आदिवासी लोकांची जमीन बिगर आदिवासी लोकांना विकल्या जात आहे. याबद्दल आदिवासी शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदार यांची भेट घेऊन अशा जमिनी आदिवासी शेतकऱ्यांना पुन्हा परत करण्याची मागणी या आदिवासींनी केली.

कर्जत तालुका हा आदिवासी भाग म्हणून गणला जातो आणि आदिवासींची फसवणूक करून जमिनी हस्तांतरित करण्याचा प्रकार सर्रास चालू आहे. त्यातच अंतराट तर्फे वरेडी येथील सर्वे नंबर ३०/४ अ क्षेत्र एक हेक्टर ९५ गुंठे जमीन आनंद नरहर सुगवेकर यांच्या नावे होती. सन ५/६/१९६८ रोजी गोपाल रामा पारधी व इतर यांच्या नावे आहे. आदिवासी लोक खातेदार असून त्या त्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर कुळ म्हणून नोंद आहे.त्यात इतर हक्कात कुळाचे हक्क प्राप्त होऊन फ ेरफार क्रमांक ७६६ वर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ३६ ब व ३६ अ अन्वये बिगर आदिवासी खातेदारांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय जमीन हस्तांतरणास बंदी असा शेरा ठेवण्यात आला आहे. तरीसुद्धा ही आदिवासी खातेदारांची जमीन तहसीलदार कर्जत यांच्या आदेशानुसार आदिवासी कुळ खातेदार गोपाल रामा पारधी व इतर यांच्या नावे वीस गुंठे ठेवून उर्वरित एक हेक्टर ७५ गुंठे क्षेत्र बिगर आदिवासी सावकार आनंद नरहर सुवेकर यांच्या नावे करण्यात आली आहे.

बगर आदिवासी खातेदारांना जमीन हस्तांतरणास बंदी असताना



प्रथमदर्शनी आदिवासी खातेदारांच्या अशिक्षित पणाचा फायदा घेऊन त्या आदिवासी खातेदारांना खोटे सांगून तहसीलदार कार्यालयात हजर न करता परस्पर फार्म हाऊसवर सह्या घेऊन एका खातेदाराच्या नावे शपथपत्र नोंद करून जमीन १८ गुंठे आदिवासी खातेदारांच्या नावे व उर्वरित जमीन स्वतःच्या नावे करण्याचे तहसील कार्यालय कर्जत यांच्याकडून आदेश घेऊन स्वतःच्या नावे करून घेतली असल्याचे निदर्शनात आले आहे. पोलीस मित्र संघटनेचे उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश रमेश कदम सामाजिक कार्यकर्त्यांकडून आदिवासी बांधवांच्या फसवणुकीची दखल घेत अंतराट तर्फे वरेडी येथील आदिवासी खातेदार अनंत कान्हू खडवी, चांगी रामा पारधी व गोपाळ पारधी यांचे वारसदार धर्मी काशिनाथ निरगुडा यांनी उपविभागीय अधिकारी कर्जत प्रकाश संकपाल, तसेच तहसीलदार अधिकारी कर्जत डॉ. धनंजय जाधव आणि पोलीस निरीक्षक ठाणे कर्जत उमेश पाटील यांच्याकडे लेखी निवेदन देऊन याची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली होती.

जमीन आदिवासी खातेदार यांच्या नावे पुन्हा जैसे थे करण्यात यावी किंवा अनियमितता झाल्यामुळे सरकार जमा करण्यात यावी, अशी आदिवासी खातेदार यांच्या वतीने पोलीस मित्र संघटनेची मागणी असून, संबंधित महसूल विभागीय प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांना पंधरा दिवसांत या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई न झाल्यास आदिवासी खातेदार तक्रारदार यांच्या सर्व कुटुंबासमवेत बेमुदत अमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असे रमेश कदम यांनी जाहीर केले.

# अल्पसंख्याक मतदारांची भूमिका निर्णायक

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघर येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणाऱ्या पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत तळोजा-खारघर परिसरातील प्रभाग क्रमांक ३ मध्ये अल्पसंख्याक मतदारांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. एकूण मतदारसंख्येतील मोठा टक्का अल्पसंख्याक समाजाचा असल्याने कोणत्याही उमेदवाराचा विजय अथवा पराभव या मतदारांच्या मतदानावर अवलंबून राहणार आहे. त्यामुळे सर्वच राजकीय आणि अपक्ष उमेदवारांनी अल्पसंख्याक मतदारांना आकर्षित करण्यासाठी विशेष रणनीती आखली आहे.

पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक ३ मध्ये ४७ हजार ७१५ मतदार आहेत. या प्रभागात अल्पसंख्याक समाज मोठ्या संख्येने वास्तव्यास असून, या समाजाची मतदार संख्या १८ हजार आहे. शिक्षण, रोजगार, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा आदी मूलभूत सुविधांचे प्रश्न या मतदारांसाठी प्राधान्याचे ठरले आहेत.

मागील काही वर्षांत नागरी सुविधा अपुऱ्या राहिल्याची भावना अल्पसंख्यांक समाजात असून, काम करणारा आणि सर्वसमावेशक विकास करणारा उमेदवारच निवडून देऊ, अशी भावना अल्पसंख्याक मतदार व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे, यावेळी मतदार केवळ पक्षचिन्हावर नव्हे तर, उमेदवाराची प्रतिमा, कामाचा अनुभव आणि स्थानिक प्रश्नांवरील भूमिकेचा सखोल विचार करताना दिसत आहेत. त्यामुळे पारंपरिक मतांचे ध्रुवीकरण कमी होऊन विकास विरुध्द दुर्लक्ष असा थेट सामना रंगण्याची शक्यता आहे. अनेक उमेदवारांनी अल्पसंख्याक वस्तीमध्ये प्रत्यक्ष भेटी, संवाद सभा, घराघरांत प्रचार तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींशी चर्चा सुरु केली आहे. खारघर आणि तळोजा या दोन्ही भागांच्या सीमारेषेवर असलेल्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये झपाट्याने शहरीकरण झाले असले तरी मूलभूत सुविधा त्या वेगाने पोहोचल्या नसल्याची तक्रार या प्रभागातील मतदार करीत आहेत. त्यामुळे यंदा आश्वासन नव्हे, तर अंमलबजावणी हाच मुख्य मुद्दा बनला आहे.

दरम्यान, ओवेगाव मध्ये वास्तव्यास असलेले भाजपा अल्पसंख्याक विभागाचे माजी रायगड जिल्हा अध्यक्ष मन्सूर पटेल गेल्या अनेक वर्षांपासून भाजपा मध्ये काम करीत असून, अल्पसंख्याक समाजाचे मतदान भाजपाच्या पारड्यात पडावे, यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत. महापालिका प्रभाग क्रमांक ३ मध्ये अल्पसंख्यांक मतदारांचा कौल कोणाच्या पारड्यात पडतो, यावरच भावी नगरसेवकाचे भवितव्य ठरणार आहे. त्यामुळे निवडणूक जसजशी जवळ येईल, तसतशी अल्पसंख्याक मतदारांच्या भूमिका आणि अपेक्षांकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत होत आहे.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती रणसंग्रामाची नांदी

**■ उरणात उमेदवारीसाठी राजकीय चढाओढ**

| उरण | प्रतिनिधी |

नगरपालिका निवडणुकीचा धुरळा अजून खाली बसलेला नसतानाच आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले आहे. आगामी काळात महानगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला वेग दिला आहे.

उरण तालुक्यातील राजकीय वर्तुळात सध्या ''उमेदवारी कोणाला?'' हाच एकमेव चर्चे चा विषय बनला आहे. इच्छुक उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून मैदानात उतरले असून, पक्षश्रेष्ठींच्या दारात सतत फेऱ्या वाढल्या आहेत.

ज्यांची उमेदवारीची शक्यता धूसर झाली आहे, त्यांनी विरोधी पक्षांच्या उंबरठ्यावर चाचपणी सुरू केली, तर ज्यांना उमेदवारीचा शब्द मिळाला त्यांनी थेट पक्षप्रवेश करत आपली राजकीय दिशा स्पष्ट केली आहे. काहींनी मात्र उमेदवारी हुकल्याची नाराजी तात्पुरती म्यानात ठेवून पुन्हा पक्षाच्या कार्यक्रमांत सक्रिय होण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

उरण नगरपालिका निवडणुकीत भाजपाची मक्तेदारी मोडीत काढत महाविकास आघाडीने बाजी मारली, मात्र सत्तेची गणिते जुळविताना महाविकास आघाडीला तारेवरची कसरत करावी लागणार, हेही तितकेच खरे आहे. नगरपालिका निवडणुकीच्या निकालातून सत्ताधाऱ्यांविरोधात नाराजीचा सूर उमटताना दिसतो आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा कार्यक्रम लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून, त्याआधीच उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी बैठकींचा सपाटा सुरू झाला आहे. या बैठकींत इच्छुकांची संख्या, ताकद आणि समीकरणे तपासून उमेदवारीवर शिक्कामोर्तब करण्याची कसोटी पक्षातील पदाधिकाऱ्यांसमोर उभी ठाकणार आहे.

## वर्षा सहस्त्रबुद्धेंची बँक सखीपदी निवड

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्याजवळील निडी येथील रहिवासी असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या वर्षा ओमकार सहस्त्रबुद्धे यांची स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नागोठणे शाखेच्या अंतर्गत बँक सखी पदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.



स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नागोठणे शाखेचे व्यवस्थापक वृषभ यांच्याकडून वर्षा सहस्त्रबुद्धे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बँक सखी ही ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू केलेली एक योजना आहे.

# आघाडीची पालिका निवडणुकीत मुसंडी

**● पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक ४,५,६ मध्ये जोरदार प्रचार**

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महापालिका निवडणुकीचा पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने प्रभाग क्रमांक ४,५,६ मध्ये जोरदार प्रचार केला आहे. पनवेल महानगरपालिका निवडणूक-२०२६ प्रभाग क्रमांक ४, ५, ६ मधील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडी समर्थित उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर पदयात्रा व मतदारांशी संवाद साधला. जनतेचा मिळालेला विश्वास आणि कार्यकर्त्यांचा उत्साह निश्चितच परिवर्तनाची दिशा दाखवणारा आहे.



या प्रचारावेळी माजी आमदार तथा शिवसेना उपनेते सुरेंद्रनाथ बाळ माने, माजी आमदार बाळाराम पाटील, संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, सहसंपर्क प्रमुख अनिल चव्हाण, महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर प्रमुख अवचित राऊत, तालुका प्रमुख संदीप तांडेल यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजू सोनींच्या तत्परतेमुळे कबुतराला जीवदान

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे कबुतराला जीवदान मिळाले आहे.



शहरातील झवेरी बाजार येथील महावितरण कंपनीच्या हाय टेन्शनवर एक कबूतर अडकला आहे, याची माहिती येथील व्यापारी व नागरिकांनी मा. नगरसेवक राजू सोनी यांना फोनद्वारे कळवली. त्यांनी तात्काळ तेथे धाव घेऊन तेथे त्यांचे स्वीय्य सहाय्यक मंदार देसाई यांना बोलवून तेथे अग्निशमन दल व महावितरण कर्मचारी यांना बोलवण्यास सांगितले. देसाई यांनी लगेचच अग्निशामक दल व महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांना बोलवले. महावितरण कंपनीचे कर्मचारी येऊन जिवाची पर्वा न करता हाय टेन्शनवर चढून तात्काळ त्या लटकलेल्या कबुतराचे सुखरूप प्राण वाचवले व त्याला सोडण्यात आले. त्यामुळे येथील नागरिकांनी राजू सोनी, मंदार देसाई व महावितरण कर्मचारी यांचे कौतुक करून आभार मानले.

# अनिता चव्हाण पैठणीच्या मानकरी

| खरोशी | प्रतिनिधी |

प्राथमिक शिक्षक वर्धापन दिनानिमित्त खालापूर तालुक्यात महिला भगिनींसाठी कोण जिंकणार पैठणी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये २७ महिला भगिनींनी सहभाग घेतला होता. अत्यंत अतितटीच्या आणि चुरशीच्या स्पर्धेमध्ये शेवटच्या क्षणापर्यंत कोण जिंकेल याची उत्सुकता सर्व तालुक्यातील शिक्षक बंधू-भगिनींना लागली होती. मात्र, शेवटच्या क्षणी काही सेकंदामध्ये पैठणी विजेती अनिता चव्हाण ठरल्या, तर उपविजेती तृप्ती ताठरे या झाल्या. तर, टॉप थ्रीमध्ये सुवर्णा घोडके, मनीषा सानप, पल्लवी चौलकर यांनी स्थान पटकावले. या कार्यक्रमाचे निवेदन अजित हरवले यांनी केले.



दरम्यान, महिला शिक्षिकांसाठी संगीत खुर्चीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रथम क्रमांक कांचन कडू, द्वितीय सुगीता गवळी, तर तृतीय क्रमांक जयश्री सुर्वे यांनी पटकावला. तर, शिक्षकांसाठी आयोजित क्रिकेट स्पर्धेमध्ये केंद्र आत्करगाव विजेता, तर उपविजेता वावर्ले केंद्र ठरला. तृतीय क्रमांक केंद्र देवन्हावे ठरला, उत्कृष्ट फलंदाज मधु पारधी, उत्कृष्ट गोलंदाज दादासाहेब मुंजाळ, मालिकावीर योगेश बिरादार या सर्व विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. स्पर्धा मंगलमूर्ती मैदान, कलोते मोकाशी येथे घेण्यात आल्या.

शिक्षक संघ वर्धापन दिन ७ जानेवारी २०२६ रोजी खालापूर तालुक्यातील शिक्षकांचे क्रिकेट सामने व महिला भगिनींसाठी खेळ पैठणीचा, संगीत खुर्ची तसेच विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष भोपी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विक्रम त्रिवेदी ट्राय अँड श्रेयस फाउंडेशनचे विक्रम त्रिवेदी, भावना त्रिवेदी (अध्यक्ष, इनरव्हील क्लब बॉम्बे पियर), शिल्पा दास,

## शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

वरिष्ठ विस्तार अधिकारी नंदा मोहिते, केंद्रप्रमुख संघटना अध्यक्ष, खालापूर शिक्षक नेते उमेश विचारे, दिलीप देशमुख, संतोष पाटील, हेमंत म्हात्रे, जयंत पाटील, पत्रकार धनाजी घरत, राजन पाटील, मनोहर म्हात्रे, तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक बंधू-भगिनी तसेच तालुक्यातील संघटनाप्रेमी शिक्षक वर्ग प्राथमिक शिक्षक संघ शाखा, खालापूर अध्यक्ष दिपक पालकर, कार्याध्यक्ष मारूती दासरे, सरचिटणीस धनाजी थिटे, सहकार्याध्यक्ष बाळू भालसिंग, संतोष निघोट, उपाध्यक्ष सचिन कडू, सहचिटणीस पांडुरंग काळे जगदीश मोहने, खजिनदार विठ्ठल देशमुख, सहखजिनदार किरण धारणे, हनुमंत गाडे आदी खालापूर तालुक्यातील शिक्षक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# उरणच्या कॉलेजमध्ये जल्लोष

| चिरनेर | प्रतिनिधी |

यू.ई.एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स अँड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमध्ये फन फेअर व पॅरेन्टस् इव्हिनिंग मोठ्या जल्लोषात व अभूतपूर्व गर्दीत साजरा करण्यात आला. यावेळी पटांगणात विविध खाद्य पदार्थांचे व खेळांचे स्टॉल्स लावले होते. त्यापैकी पहिल्या स्टॉलला बांधलेली फीत कापून यू.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, खजिनदार ॲड. अपूर्वा ठाकूर, माजी मानद सचिव आनंद भिंगार्डे, प्रभारी प्राचार्या डॉ. मीनाक्षी गुप्ता, प्रा. सिमरन दहिया, विभाग प्रमुख व पर्यवेक्षिका व पी.टी.ए. सदस्य तसेच विविध स्तरातील अन्य मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

## जिल्हाधिकाऱ्यांची जेएसडब्ल्यूला तंबी

वाहिनीच्या कामादरम्यान मनोऱ्याखाली व वाहिनीखाली बाधित होणाऱ्या जमिनीच्या मोबदला व नुकसानभरपाईबाबत कानसई (ता. रोहा) ते कासरुघुंटवाडी (निगडे, ता. पेण) परिसरातील बाधित शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक दि. ८ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथील राजस्व सभागृहात पार पडली.

या बैठकीत उपजिल्हाधिकारी श्रीकांत गायकवाड यांनी महापारेशनचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अ.उ.दा. उपकेंद्र प्रकल्प, उपविभाग ठाणे येथील मिथुन रामटेके यांना स्पष्ट शब्दांत आदेश देत सांगितले की, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय जेएसडब्ल्यूच्या ४०० के.व्ही. उच्चदाब पारेशन वाहिन्यांचे मनोरे उभारू नयेत, तसेच कोणतेही संबंधित काम करू नये. तसेच बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचा प्रथम सविस्तर सर्व्हे करून वाहिनीचा ले-आऊट प्रसिद्ध करावा व त्यानंतर पंधरा दिवसांच्या आत बाधित शेतकऱ्यांना सविस्तर लेखी नोटीस देण्याचे आदेशही देण्यात आले.

या बैठकीस जिल्हाधिकारी किशन जावळे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीकांत गायकवाड, महापारेशनचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता मिथुन रामटेके, पेणचे उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, जेएसडब्ल्यू कंपनीचे अधिकारी ॲड. मानसी म्हात्रे, किशार म्हात्रे, गणपत म्हात्रे, पांडुरंग म्हात्रे, संतोष म्हात्रे, मधुकर ठाकूर, मिलिंद डाकी, राकेश म्हात्रे, नथुराम पाटील, हर्षल ढमाळ, ॲड. गणेश जाधव, प्रशांत भोईर, दत्ताराम करजेकर, मंगेश जाधव आदींसह कानसई ते वडखळपर्यंतचे शेकडो बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाच्या या ठाम भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# संयम, आत्मविश्वास असल्यास यश मिळते

**■ शुभम आंबवणे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

| कर्जत | प्रतिनिधी |

देशासाठी काही तरी केले पाहिजे. या भावनेने मी या क्षेत्रात पडलो. दहावीत पहिला किंवा पहिल्या पाचमध्ये उत्तीर्ण झाला तरच आपण यशस्वी होऊ शकतो असे नाही तर संयम आणि आत्मविश्वास असेल तर यश आपल्या जवळ येते. काहीही झाले तरी आपले आई-वडील, गुरुजन आणि आपल्या शाळेला कधीही विसरू नका. कारण त्यांच्यामुळेच आपण आज आहोत. आपल्याला काही झाले तर आपल्याला माता-पित्यांचे हृदय सर्वात आधी हेलावते. हे आयुष्यभर लक्षात ठेवा. त्यांनी केलेल्या संघर्षामुळेच हे दिवस पाहायला मिळाले आहेत. याचे भान नेहमी ठेवा, असे मार्गदर्शन केंद्र सरकारमध्ये उच्चपदस्थ अधिकारी असलेल्या शाळेचा माजी विद्यार्थी शुभम आंबवणे यांनी केले.

कर्जत एज्युकेशन सोसायटी संचलित इंग्लिश मीडियम स्कूलच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभा निमित्त माजी विद्यार्थी शुभम सुनील आंबवणे यांना प्रमुख पाहुणे निमंत्रित केले होते. त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी कार्याध्यक्ष अनिरुद्ध जोशी, सचिव प्रवीण गांगल, खजिनदार मदन परमार, सतीश पिंपरे, श्रीकांत मनोरे, साक्षी आंबवणे, मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी, सुनील बोरसे, नगमा नजे, भारती पाटील



उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिव तांडव, दक्षिणात्य नृत्य, कोळी नृत्य, राजस्थानी लोकनृत्य, साऊथ इंडियन डान्स यांसारखी रंगतदार सादरीकरणे केली. तसेच महाभारतकालीन द्रौपदी वस्त्रहरणाचा देखावा आणि 'नटसम्राट' नाटकाचा एक अंक यामुळे प्रेक्षक भारावून गेले. त्यानंतर लहान विद्यार्थ्यांनी सादर केलेला रोप मल्लखांब हा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. वैष्णवी दगडे, देवराज बोराडे, संस्कार शेलार, आर्यन चव्हाण, अंश जोशी या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे विशेष कौतुक करण्यात आले.

मुख्याध्यपिका चौधरी यांनी शाळेचा शैक्षणिक आढावा सादर केला. डॉ. जोशी यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त शाळेत अनेक उपक्रम वर्षभर राबविण्यात आले, असे सांगितले. यावेळी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उरण येथे प्रबोधन कार्यक्रम

| उरण | प्रतिनिधी |

उरण येथील कोकण ज्ञानपीठ विद्यालययात कायदेविषयक शिबीर व रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या अनुषंगाने प्रबोधन कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कायदेविषयक माहिती आणि रस्ता वाहतूक नियमांबाबत जागरूकतेचे माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात एम.एस. काझी, एस.पी. वानखेडे, जे.के.आर. टंडन, दिवाणी न्यायाधीश, उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाचा मुख्य विषय कायदेविषयक शिबीर व रस्ता वाहतूक नियम हा होता. यावेळी विद्यार्थ्यांना रस्ता वाहतूक नियमांचे पालन कसे करावे आणि त्याबद्दल कायदेविषयक माहिती असण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळी कार्यक्रमात एकूण १०० ते १५० विद्यार्थी, शाळेचे शिक्षक वर्ग व इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील शंकांचे निरसन करुन घेतले. दरम्यान, उपस्थित मान्यवरांनही विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत त्यांचे समाधान केले.

# जिवंत काडतुसे बाळगणाऱ्यास पोलीस कोठडी

| पनवेल | प्रतिनिधी |

महापालिका निवडणुकीच्या कालावधीत कायदा आणि सुव्यवस्था अबधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून काटेकोर लक्ष ठेवण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे व फरार आरोपी, गुंड, हिस्ट्रीशीटर तसेच अमली पदार्थ व मद्याची विक्री व सेवन करणारे, बेकायदा हत्यार बाळगणारे गुन्हेगार व बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांची धरपकड सुरू केली आहे. त्यातच खारघर पोलिसांनी नुकतेच सेक्टर-४० मधील पापडीचा पाडा येथे बेकायदेशीर गावठी कट्टा व २ जिवंत काडतुसे बाळगणाऱ्यास अटक केली आहे.

पनवेल महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी शहरात कोम्बिंग ऑपरेशन राबवून अवैध धंदे, गुन्हेगार, एनडीपीएस, अवैध शस्त्राबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, गुन्हे प्रकटीकरण पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद बरकडे व त्यांचे पथक खारघर हद्दीमध्ये गस्त घालत असताना खारघरमधील पापडीचा पाडा भागात रेकॉर्डवरील आरोपी समु इक्बाल शेख हा संशयितरीत्या फिरताना निदर्शनास आला. त्यामुळे पोलिसांनी त्याला घेराव घालून ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळ १ गावठी कट्टा व २ जिवंत काडतुसे सापडली. त्यानंतर पोलिसांनी त्याला बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याप्रकरणी अटक केली. हा गावठी कट्टा आणि जिवंत काडतुसे त्याने कुठून व कशासाठी आणले, याचा पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच समाजकंटकांवर व गुन्हेगारांवर वचक राहून निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात, यासाठी पोलिसांकडून अवैध अग्निशस्त्र बाळगणारे, अमली पदार्थ आणि अवैध दारूची विक्री व वाहतूक करणाऱ्या व्यक्तींवर

# उमेदवारांनंतर आता मतदारांचीच बोली

| उरण | प्रतिनिधी |

महानगरपालिका निवडणुकीच्या रणांगणात उमेदवारांची खरेदी-विक्री उघडपणे सुरू असून, अनेक राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी लाखोंची खिरापत घेऊन निवडणूक रिंगणातून माघार घेतल्याचे चित्र आहे. उमेदवारांचा बाजार आटोपताच आता निवडणूक लढणाऱ्या प्रभागांत थेट मतदारांनाच मोठमोठी आमिषे दाखवून खरेदी करण्याचा प्रयत्न सुरू झाल्याची चर्चा आहे. महानगरपालिका निवडणुकीत सध्या घोडेबाजार तेजीत असल्याचे उघडपणे दिसून येत आहे. राजकीय पक्षांनी प्रतिस्पर्धी उमेदवारांना 'मॅनेज' करून उमेदवारी अर्ज माघारी घेण्यास प्रवृत्त केले आहे. काही ठिकाणी उमेदवारांनी मैदान सोडले, तर काही प्रभागांत मात्र लढत अटळ ठरली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही उमेदवारांनी पक्षाला विश्वासात न घेता परस्पर लाखोंचा व्यवहार करून निवडणूक रिंगणातून माघार घेतल्याची चर्चा आहे. परिणामी जे उमेदवार बिनविरोध निवडून आले, त्यांचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला असून, त्यांची राजकीय चिंता कायमस्वरूपी मिटल्याचे चित्र आहे. मात्र, जे उमेदवार अजूनही मैदानात टिकून आहेत, त्यांच्या अंगात धडकी भरली असून खर्चाचा डोंगर डोळ्यांसमोर उभा ठाकला आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक रिंगणातील उमेदवारांसह राजकीय पक्ष आणि त्यांचे पदाधिकारी यांची खरी कसोटी सुरू झाली आहे.

# अलिबागमध्ये विक्रमादित्य प्रशांत दामलेंचा गौरव

## पीएनपी नाट्यगृहात १३ हजार ३८० वा प्रयोग हाऊसफुल्ल

## चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

ज्याचं जगणं, विचार, बोलणं सगळंच नाटक आहे, असा रसिकांचा लाडका कलाकार, रंगभूमीचे बादशाह, मराठी रंगभूमीवरचा देखणा, गोंडस, जबरदस्त प्रतिभेचा, सुरेल गळ्याचा, रसिकांचा लाडका अभिनेता प्रशांत दामले यांनी आपल्या प्रदीर्घ रंगभूमी कारकीर्दीतील १३ हजार ३३३ प्रयोग पूर्ण करत नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहात १३,३८० वा नाट्यप्रयोग सादर झाला, ही ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे.

मराठी रंगभूमीला जागतिक स्तरावर नेणाऱ्या या कलाकाराच्या विक्रमी कामगिरीमुळे अलिबागच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णपान जोडले गेले आहे. या अविस्मरणीय क्षणाचे साक्षीदार होण्याची संधी संपूर्ण अलिबागकरांना लाभली. प्रयोगाच्या मध्यांतरात प्रशांत दामले यांचा पीएनपी सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. रंगभूमीवरील त्यांच्या अथक योगदानाबद्दल रसिकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना मानवंदना दिली. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, संजना किर, विक्रांत वार्डे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, कलाकार, रंगकर्मी, सामाजिक कार्यकर्ते तसेच हजारो नाट्यप्रेमी उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणांतून प्रशांत दामले यांच्या शिस्तप्रियता, सातत्य, साधेपणा आणि अभिनयावरील निष्ठेचे कौतुक केले.



### काय आहे नाटक?

प्रशांत दामले फॅन फाऊंडेशन प्रकाशित व गौरी थिएटर्स निर्मित शिकायला गेलो एक हे नाटक एका आदर्शवादी शिक्षक आणि त्याच्या बंडखोर विद्यार्थ्याच्या नात्यावर आधारित आहे. प्रशांत दामले आणि ऋषीकेश शेलार यांच्या जोडीने रंगमंचावर तुफान रंगत आणत प्रेक्षकांना खिळवून ठेवले. या सादरीकरणाने प्रेक्षकांना हास्याबरोबरच अंतर्मुख होऊन विचार करायला लावले. या नाटकाची मूळ कथा द.मा. मिरासदार यांची असून, अद्वैत दादरकर यांनी लेखन व दिग्दर्शन केले आहे. तसेच नेपथ्य प्रदीप मुळ्ये, संगीत अशोक पत्की, प्रकाश किशोर इंगळे तर सूत्रधार अजय कासुर्डे आहेत. या नाटकात ऋषीकेश शेलार, सुशील इनामदार, अनघा भगरे, समृद्धी मोहरीर, चिन्मय माहूरकर यांनी प्रशांत दामले यांना आपल्या उत्तम अभिनयाची साथ दिली आहे.





अलिबागमधील ज्येष्ठ कलाकार, नाट्य रसिक, आयोजक संदीप गोठीवडेकर यांनी 'शिकायला गेलो एक' या विनोदी नाटकाचा प्रयोग शुक्रवारी (दि.९) आयोजित केला होता. त्यात या विक्रमाची दखल घेण्यात आली. हा प्रयोग हाऊसफुल्ल होता. अलिबागकरांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. नाटक म्हणजे जिवंत, मृत, पौराणिक, ऐतिहासिक किंवा काल्पनिक व्यक्ती अथवा प्राणी यांच्या भूमिका करणाऱ्या नटांनी रंगमंचावर सादर केलेली कला. याचसोबत कोणतेही पात्र साकारण्यासाठी कलाकाराला त्या पात्रामध्ये उतरून ते नाटक जगावं लागतं तेव्हा एखादं नाटक सार्थकी लागतं. १३,३८० प्रयोगांचा पल्ला गाठणारं दर्जेदार व्यक्तिमत्त्व, मराठी नाटककार आणि दिग्गज अभिनेते प्रशांत दामले हेसुद्धा ही तत्त्वं पाळताना दिसतात. प्रशांत दामले यांना नाटकांमध्ये विशेष रस आहे. म्हणून ते मालिका आणि चित्रपटांपेक्षा जास्त नाटकात काम करताना दिसतात. आजवर प्रशांत दामले त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मराठी चित्रपटामध्ये प्रशांत दामले हे विनोदी अभिनेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी त्यांच्या करियरची सुरुवात 'टूर टूर' या नाटकापासून केली. पुढे त्यांनी मोरूची मावशी या नाटकापासून व्यावसायिक नाटकाकडे वाटचाल केली. प्रशांत दामले हे केवळ एक अभिनेताच नाही तर एक उत्तम माणूस देखील आहेत. त्यांनी प्रशांत फॅन फाऊंडेशन नावाचे स्वतःचे फाऊंडेशन सुरू केले आहे ज्याद्वारे ते समाजाच्या कल्याणासाठी सामाजिक कार्य करत असतात. त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या जल कार्यक्रमासाठी १ लाख रुपये देणगी दिली आहे.



> 
>
> अलिबागमध्ये खूपदा येणं झालं आहे. अलिबागची माणसं खूप स्वच्छ आणि निर्मळ मनाची आहेत. जे नाही मिळालं, त्याचं कधीच दु:ख केलं नाही, जे मिळालं त्याचा खूप आनंद आहे. चित्रलेखा पाटील यांचा खूप आभारी आहे. कारण, पीएनपी नाट्यगृह जेव्हा पहिल्यांदा झालं, त्यावेळी माझं नाटक ङ्गएका लग्नाची गोष्टफयाठिकाणी झालं होतं. त्यांनतर जेव्हा दुर्घटना झाली, त्यावेळी केवळ अलिबागकरच नाही तर, रंगभूमीसृष्टीतील सर्व कलाकार, निर्माते प्रचंड हळहळले. १९९५ पासून पीएनपी नाट्यगृह होईपर्यंत कलाकार अलिबागमधील सार्वजनिक वाचनालयात प्रयोग सादर करीत होतो. कोणत्याही कलाकाराच्या सादरीकरणामध्ये कोणतंही नाट्यगृह महत्त्वाची भूमिका बजावत असतं. एखाद्या नाट्यगृहात आपण कमालीचे खुललो आहोत आणि कधी तरी असं होतं की, आपण जेवढं खुलायला पाहिजे, तेवढं खुलत नाही. अशा सुसज्ज नाट्यगृहात काम करताना आमच्यासह रसिकांनाही मजा येते. या नाट्यगृहात प्रयोग सादर करताना खूप आनंद होत आहे. नाट्यगृह पुन्हा उभं करणं किती कठीण आहे, याची जाणीव आहे. चित्रलेखा पाटील यांनी खचून न जाता पुन्हा एकदा हे नाट्यगृह त्याच दिमाखात उभारले, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. तसेच संदीप गोठीवडेकर यांनी अलिबागमध्ये प्रयोग सादर करण्याची संधी दिली त्याबद्दलही आभार.
>
> – प्रशांत दामले, ज्येष्ठ अभिनेते, निर्माते

> 
>
> प्रशांत दामले यांच्या अभिनयसामर्थ्याची उंची कुणाचेही डोळे दीपवणारी आहे. अंगभूत कर्तृत्व आणि अथक परिश्रमाच्या बळावर प्रशांत दामले इथपर्यंत पोहोचले आहेत, यावर कुणाचंही दुमत होणं अवघड आहे. प्रशांत दामलेंना रंगभूमीवर बागडताना पाहणाऱ्या नाट्यरसिकांची ही तिसरी पिढी आहे. प्रशांत दामले यांचा आजवरचा रंगभूमीवरचा वावर थक्क करणारा आहे. विनोद म्हणजे प्रशांत दामले, आणि विनोदी नाटक म्हणजे प्रशांत दामले हे समीकरण तयार झालेलं आहे. अभिनेता, निर्माता, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष ही जबाबदारी ते त्याच दर्जाने पार पाडत आहेत. विश्व विक्रम करणाऱ्या मराठी रंगभूमीतील कलाकाराचा गौरव करण्याचा मान मिळाल्याचा आम्हा अलिबागकरांना प्रचंड अभिमान आहे.
>
> – चित्रलेखा पाटील, अध्यक्षा, पीएनपी सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळ

# प्रमोद जाधव यांना आदर्श पत्रकार पुरस्कार

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध वृत्तपत्र दैनिक कृषीवलचे जिल्हा प्रतिनिधी प्रमोद जाधव यांचा आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करुन गौरव करण्यात आला. साप्ताहिक खालापूर वार्ता व न्यूज जर्नालिस्ट असोसिएशनच्यावतीने हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी (दि.१०) खोपोली येथील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, डॉ. सुनील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.



यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रविंद्र घोडके, शरीफ बागवान, न्यू जर्नालिस्ट असो.चे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष फिरोज पिंजारी, राष्ट्रीय अध्यक्ष खलील सुर्वे, साप्ताहिक खालापूर वार्ताचे संपादक सुधीर माने, संतोष चौधरी, राष्ट्रीय महासचिव मानसी कांबळे, सागरिका जांभळे, नगरसेविका सुवर्णा मोरे, सुप्रिया साळुंखे, संजय पाटील आदी मान्यवरांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी उपस्थित होते. दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त व न्यूज जर्नालिस्ट असो.च्या वर्धापन दिनानिमित्त खालापूर वार्ता दिनदर्शिका प्रकाशन व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रासह पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. दरम्यान, कृषीवलचे प्रमोद जाधव यांना आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रमोद जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकार क्षेत्रात कार्यरत आहे. सध्या ते कृषीवलचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

# वालेकर यांचे नगरपरिषदेला निवेदन



| अलिबाग | प्रतिनिधी |

भारताचे माजी लष्कर प्रमुख जनरल अरुणकुमार वैद्य यांची पुण्यतिथी शासकीय इतमामाने साजरी होण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर प्रयत्न करत आहेत. याबाबत मुख्यमंत्री महोदयांची अनुमती मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्याशिफारशीनुसार प्रकरण मंत्रालयात प्रलंबित आहे. याप्रकरणी अलिबाग नगरपरिषदेची शिफारस मिळण्यासाठी बळवंत वालेकर यांनी नगराध्यक्षा अक्षया नाईक यांना निवेदन दिले. यावेळी समिती सदस्य ॲड. रघूजी आँग्रे, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, अजय झुंझारराव व मुख्याधिकारी साळुंखे उपस्थित होते.




# शेकापचे तगडे आव्हान

| पनवेल | प्रतिनिधी |

सध्या राज्यात महापालिकेच्या निवडणूकांचे वारे जोरदार वाहत आहेत. त्यातच पनवेल पालिकेतील निवडणूकींत जोरदार चुरस होण्याची चर्चा सुरू आहे. त्याठिकाणी शेकाप-महाविकास आघाडी विरूद्ध भाजप-महायुती अशी चुरशीची लढत होणार आहे. यावेळी शेकापचे माजी नगरसेवक रवींद्र भगत यांनी भाजपमध्ये प्रवेश करत प्रभाग १० मधून उमेदवारी मिळवल्याने ही लढत भगत यांच्यासाठी सोप्पी वाटत होती. मात्र, शेतकरी कामगार पक्ष व महाविकास आघाडीकडून माजी नगरसेवक गोपाळ भगत यांना त्यांच्या विरोधात उतरवण्यात आले आहे. त्यामुळे प्रभाग १० मधील निवडणूक अत्यंत चुरशीची आणि रंजक वळणावर पोहोचली आहे.

शेकाप आणि महाविकास आघाडीने एकजूट होऊन ही पनवेल महानगरपालिका निवडणूक लढवण्याचे ठरवले आहे. रस्ते, पाणी आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या नागरी समस्यांवर आघाडीने भर दिला आहे. त्याच सोबत या प्रभागातील हक्काची मते टिकवून ठेवण्यासाठी पदयात्रा आणि कोपरा सभांचा धडाका लावला आहे. प्रभाग १०मध्ये शेकापच्या जुन्या कार्यकर्त्यांची फळी आणि भाजपचा वाढता विस्तार यंमुळे ही लढत केवळ एका उमेदवाराची नसून दोन विचारसरणींमधील संघर्षाची बनली असल्याचे मत राजकीय विश्लेषकानी व्यक्त केले आहे. पालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत गोपाळ भगत यांनी प्रभाग ९ मधून नगरसेवक म्हणून निवडणूक जिंकली होती.तर, रवींद्र भगत यांनी प्रभाग १० मधून शेकापच्या चिन्हावर विजय मिळवला होता. रवींद्र भगत यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने प्रभाग १० मधील निवडणूक रवींद्र भगत यांना सोप्पीठरण्याचीशक्यतालक्षात घेत शेकाप-महावविकास आघाडीकडून गोपाळ भगत यांना या प्रभागात उमेदवारी दिली. त्यामुळे रवींद्र भगत यांच्यासमोर तगडे आव्हान निर्माण केले आहे. तसेच, प्रभाग क्रमांक १० 'ब'मधून ॲड. प्रज्ञा पाटील, प्रभाग १० 'क'मधून शीतल माळेवे व प्रभाग क्रमांक १० 'ड'मधून संतोष जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे.



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# हेरिटेज स्थानकाची मोडतोड

## ● नेरळ स्थानकातील लाकडी छप्पर दिसेनासे होणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या इतिहासात सर्वात आधी मुंबई ते ठाणे गाडी धावली. त्यानंतर तीन वर्षांनी खोपोलीपर्यंत ट्रेन पोहचली. त्यात नेरळ स्थानक ब्रिटिश काळात तयार झाले. त्यावेळी ब्रिटिशांनी उभारलेले सागवान लाकडी आणि दगडी बांधकाम असलेले स्थानक हेरिटेज म्हणून नोंद झाले होते. नेरळ स्थानकातील ते हेरिटेज बांधकाम हे नेरळ जंक्शन स्थानकाची शान होते. मात्र तेच लाकडी आणि दगडाने तयार झालेले निवारा शेड आणि कार्यालयाची इमारत आता तोडली जात आहे. ब्रिटिशांनी आपल्या दफ्तरी ग्रेट ब्रिटनमध्ये नोंदलेले हे बांधकाम काही दिवसांनी दिसेनासे होणार असल्याने ब्रिटिश काळातील वास्तू नजरेआड होणार आहेत.

नेरळ हे स्थानक ब्रिटिश काळात १८५६ मध्ये अस्तित्वात आल्याच्या नोंदी आहेत. पूर्वी स्थानकाची निर्मिती झाली, त्यावेळी नेरळ स्थानक हे सध्याच्या स्थानाच्या मुंबई दिशेकडे मालधक्का येथे होते. कालांतराने नेरळ-माथेरान-नेरळ मार्ग १९०७ मध्ये बनवण्यास सुरुवात झाली. त्यावेळी नेरळ स्थानक जंक्शन स्थानक बनले. तेंव्हापासून नेरळ स्थानकात सागवान लाकडे वापरून बनवलेले दगडी बांधकाम हि हेरिटेज वास्तूची साक्ष देत होते. पूर्वी गाडीला पुढे जाण्याचा इशारा देणारी सिग्नल यंत्रणा म्हणून स्थानकांच्या मध्ये लोखंडी किंवा पितळेची घंटा काम करायची. अशी घंटा नेरळ स्थानकाच्या फलाट एक आणि दोनवर होती. काही वर्षांपूर्वी नेरळ स्थानकातील या पितळेची घंटा दिसेनाशा झाल्या असून फलाट एकवरील स्थानकाचे महत्व असलेली निवारा शेड पाडून टाकली आहे. त्यांनतर आता फलाट दोनवरील मोठी हेरिटेज वास्तू जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर आहे. नेरळ स्थानकाचा मेकओव्हर करण्याचे कार्य मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून सुरु असून त्या बांधकामात नेरळ स्थानकातील जुने बांधकाम तोडून टाकण्याचा धडाका मध्य रेल्वेकडून सुरु आहे.

मात्र नवीन पद्धतीने स्थानकाचा कायापालट केला जात आहे. त्यात नेरळ स्थानकातील हेरिटेज बांधकाम तोडण्यात आले आहे आणि आता स्थानकातील मोठे बांधकाम तोडण्यात येत असताना कोणत्याही प्रकारची परवानगी ग्रेट ब्रिटनमधून घेण्यात आलेली नाही, अशी चर्चा सुरु आहे. या हेरिटेज वास्तुवर राज्य हेरिटेज कमिटीचा देखील अधिकार आहे. त्यामुळे नेरळ स्थानकातील हेरिटेज वास्तूची झालेली तोडफोड



याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाने चौकशी करावी, अशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेने केली आहे.

## निवडक

### अमली पदार्थ विरोधी सप्ताह



**तळा :** तळा पोलीस ठाण्याच्या वतीने तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो. म. वेदक विद्यामंदिर, तळा येथे रेझिंग डे तसेच जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन व सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. समाजामध्ये वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या व्यसनाला आळा घालण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जनजागृती निर्माण करणे हा यामागील उद्देश होता. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मंगेश देशमुख, तळा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विजय पाटील, पोलीस हवालदार महेश मढवी, महिला पोलीस हवालदार पूजा साळुंखे, महिला पोलीस पूजा गावडे, पोलीस अमलदार गोपाळ शेवाळे, जयश्री मचे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक विजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यातून होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान तसेच कायदेशीर परिणाम याबाबत सखोल मार्गदर्शन केले. महिला पोलीस हवालदार पूजा साळुंखे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत व्यसनापासून दूर राहण्यासाठी आत्मविश्वास, योग्य संगत व सकारात्मक छंद यांचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्षीय भाषणात मंगेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा सुयोग्य व मर्यादित वापर करण्याचे आवाहन केले.

### युवक आधारच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**पनवेल :** दैनिक युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले यांनी २०२६ सालची दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. याचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रकाशन करताना रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, अत्यंत सुंदर आणि सर्व माहितीयुक्त असे कॅलेंडरचे आज प्रकाशन करत आहे. याचा उपयोग घरातील प्रत्येक सदस्याला येथील माहितीचा फायदा होईल. यावेळी ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, रायगड ग्राम सिटी संपादक अण्णा आहेर, रायगड टाइम्स प्रतिनिधी राम बोरले, दैनिक युवक आधार संपादक संतोष शिवदास आमले, सह संपादक मुकुंद कांबळे, मुंबई विभाग संपादक किशोर गुडेकर, पनवेल तालुका प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील, पनवेल प्रतिनिधी जगदीश क्षीरसागर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### निवडणूक निरीक्षकांची माध्यम संनियंत्रण कक्षास भेट



**पनवेल :** माध्यम प्रमाणन करण्यासाठी महापालिकेच्या मुख्यालयात माध्यम प्रमाणन व संनियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षास मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) व सहाय्यक निवडणूक निरीक्षक मनिषा कुंभारे यांनी भेट दिली. यावेळी निवडणुक अधिकारी मंगेश चितळे व महापालिका अधिकारी उपस्थित होते. यावेळी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण कक्षामधील कामकाजाची त्यांनी माहिती घेतली. यावेळी त्यांनी निवडणूक काळात दैनंदिन येणाऱ्या बातम्या, दिल्या जाणाऱ्या प्रेसनोट यांचे अवलोकन केले. माध्यम पूर्व प्रमाणान प्रक्रियेची माहिती घेऊन, आतापर्यंत देण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची पहाणी केली. तसेच टिव्हीवरील येणाऱ्या बातम्या, सोशल मिडीयावरील दृकश्राव्य जाहिरती तपासणी कशा पध्दतीने केली जाते याची माहिती घेतली. तसेच पेड न्यूजबाबत माहिती घेतली.

### विद्यार्थ्यांनी साधला पोलिसांशी संवाद



**खरोशी :** पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल सहायक पोलीस अधिकारी राजपूत, ठाणे अंमलदार आणि पोलीस कर्मचारी यांच्यासमवेत रेझिंग डे पोलीस वर्धापन दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांशी हितगुज साधला. पेण येथील सुमतीबाई वि. देव सुबोध विद्यालय पेण येथील प्रशालेतील तिसरी इयत्तेतील १३० विद्यार्थ्यांना पोलीस अधिकारी राजपूत यांनी शस्त्र बंदूक कशी हाताळायची, याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. याशिवाय पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्याशी विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणाने संवाद हितगुज साधले. अनेक बाबींचे मजेशीर कुतूहल आणि बिनधास्तपणा पाहून पोलिसही भारावले. नव्या भारताची ही नवी पिढी निर्भीड बोल बरंच काही सांगून जाते. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका अनिता घोडके, सहशिक्षिका प्रज्ञा कावतकर, अदिती कुत्रे, शिक्षक दुर्गेश वारगुडे, देवेंद्र नाईक यांनी हा शैक्षणिक उपक्रम मुलांसाठी पेण पोलीस ठाण्यात भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रफुल्लीत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आनंदाने आणि उत्साहाने कार्यक्रमात सहभाग घेतला. तसेच पोलिसांनी दाखवलेल्या प्रात्यक्षिकांमुळे मुलांच्या मनातील पोलिसांविषयी असलेली भीती नाहीशी झाली.

### राजाभाऊ पेंडसे यांचे निधन

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील इंग्रजीचे ख्यातनाम शिक्षक राजाभाऊ पेंडसे यांचे शनिवारी (दि.१०) निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८७ वर्ष होते. श्रीवर्धन ब्राह्मण सभेचे अध्यक्ष प्रसाद पेंडसे यांचे ते वडील होत. पेंडसे यांची सेवा श्रीवर्धन, नागोठणे, पनवेल येथील हायस्कूलसमध्ये झाली होती. त्यांच्या पश्चात मुलगा प्रसाद, सून, नातू, नातसून कन्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राजाभाऊ पेंडसे यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रांतील अनेक लोकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले.

## विद्यामंदिरमध्ये चित्रकला, रांगोळी स्पर्धा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

श्री स्वामी विवेकानंद शैक्षणिक संस्था संचलित जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर आजिवली तालुका पनवेल जिल्हा रायगड येथे राष्ट्रीय सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते सदर स्पर्धेमध्ये ५० ते ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

अतिशय उत्तम चित्रकला व रांगोळी स्पर्धेत मुलांनी प्रदर्शन केले. यावेळी निरीक्षक वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनवेल वाहतूक शाखा प्रकाश सपकाळ, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत



पवार, पोलीस हवालदार संजय गावडे, ज्ञानेश्वर वाघ, पोलीस शिपाई योगेश जाधव व चालक श्रेयस जाधव असे अंमलदार उपस्थित होते.

## सातत्याच्या बळावर यश संपादन करावे

### शिरीष कांबळे यांचे प्रतिपादन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांसाठी वार्षिक स्नेहसंमेलन हे धमाल करण्याचे ठिकाण असते, मात्र त्या सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखील होत असतो. त्यामुळे शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक त्रिवेणी संगम आपल्या वाटचालीत ठेवताना विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या बळावर यश संपादन करावे, असे आवाहन मध्य रेल्वेचे वाणिज्य निरीक्षक शिरीष कांबळे यांनी केले.

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण यांच्या कर्जत शहरातील दहिवली येथे असलेल्या जनता



विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि विद्यालयाचे माजी विद्यार्थी, मुंबई सेंट्रल रेल्वेचे वरिष्ठ निरीक्षक शिरिष कांबळे यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. तसेच या कार्यक्रमास चित्रपट दिग्दर्शक अलोक कसबे, विठ्ठल मंदिर संस्थानचे उपसेक्रेटरी सुनील नांदुस्कर आणि कर्जत नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा रजनी गायकवाड, विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रताप गीते, अलका घरत, ज्योती घरत आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेले लेख व कवितांचे 'हस्तलिखित' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

शाळेचे माजी विद्यार्थी आणि मध्य रेल्वे चे वाणिज्य निरीक्षक शिरीष कांबळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या बळावर यश संपादन करावे, असा यशाचा मंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. स्वतःच्या अनुभवातून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तर 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'चे समन्वयक महेंद्र धारे यांनी विद्यार्थ्यांशी अतिशय सोप्या आणि हसत-खेळत संवाद साधत प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांकडे केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही, तर कौशल्य, सकारात्मक दृष्टिकोन आणि कष्ट करण्याची तयारीही तितकीच महत्त्वाची आहे, असे मत त्यांनी मांडले.

## 'निष्पक्ष, पारदर्शी राहून काम करावे'

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक कामी नेमणूक झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामात कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. त्यांनी अत्यंत दक्षतेने निष्पक्ष व पारदर्शी राहून काम करावे, अशा कठोर शब्दांत सूचना निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्या.

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६च्या पार्श्वभूमीवर क्षेत्रिय अधिकारी, भरारी पथक प्रमुख, स्थायी निगरानी पथक प्रमुख व व्हिडिओग्राफी निगराणी पथक अशा सर्व पथकाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक शनिवारी महापालिका मुख्यालयात घेण्यात



### आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचना

आली, याप्रसंगी ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले, शासनाने क्षेत्रिय अधिकारी, भरारी पथक प्रमुख, स्थायी निगरानी पथक प्रमुख व व्हिडिओग्राफी निगरानी पथक प्रमुखांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित करण्यात आल्याने निवडणूकीचे काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणत्याही दबावाला, अमिषाला बळी न पडता दक्ष राहून काम करावे, सर्व कामकाजाचे दस्तऐवजीकरण करून, उमेदवारांच्या होणाऱ्या खर्चावरही लक्ष ठेवावे, खर्चाच्या सर्व नोंदी काटेकोरपणे करव्यात, अशा सूचना यावेळी आयुक्तांनी दिल्या. तसेच आदर्श आचारसंहितेची पालन होते की नाही, कसे होते या संदर्भात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जागरूकतेने काम करावे, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

## प्रीती ठाकूर यांना पुरस्कार

**उरण :** उरण तालुक्यातील जसखार येथील प्रकल्पग्रस्त ज्येष्ठ नागरिक संस्था यांच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापिका प्रीती सचिन ठाकूर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. प्रा. प्रीती ठाकूर या आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. या पुरस्कारप्राप्तीबद्दल सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## पोलिसांकडून शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल :** पोलीस वर्धापन दिनाचे औचित्य साधून रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने श्री प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिखले तालुका पनवेल येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिखले येथील विद्यार्थ्यांना तालुका पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे पोलीस ठाण्यातील हत्यार, पोलिसांचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज याची माहिती देण्यात आली. तसेच सायबर गुन्हे, नशामुक्ती संदर्भात मार्गदर्शन केले. अंमली पदार्थाचे सेवन व त्यापासून होणारे दुष्परिणाम, वाहतुकीचे नियम याबाबत माहिती दिली. सायबर हेल्पलाइन नंबर १९३० व तात्काळ पोलीस मदतीकरिता डायल ११२, या संदर्भात माहिती दिली. यावेळी शिक्षक, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाबूलाल जैन यांचा सन्मान

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

विमा क्षेत्रात गेली पंचवीस वर्षे सातत्याने, प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्यरत असलेल्या बाबुलाल जैन यांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ग्राहकसेवेत उल्लेखनीय ठसा उमटवणाऱ्या त्यांच्या कार्याचा गौरव ठाणे विभागातील सीएलआयए मॅनेजर गणेश घग तसेच भारतीय जीवन विमा महामंडळाच्या (एलआयसी) रोहा शाखा अधिकारी हरिश्चंद्र बिरारी यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात बाबुलाल जैन यांच्या दीर्घ सेवाकाळातील योगदानाचा आढावा घेण्यात आला. विमा



क्षेत्र हे केवळ व्यवसाय नसून सामाजिक सुरक्षिततेचे महत्त्वाचे माध्यम असल्याचे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. ग्रामीण व शहरी भागातील अनेक कुटुंबांना विमा संरक्षण मिळवून देण्यात बाबुलाल जैन यांनी मोलाची भूमिका बजावली असून ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात ते यशस्वी ठरले आहेत.

## विठोबा खाडे यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्याजवळील वणी गावातील रहिवासी आणि राजिपचे सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक विठोबा धोंडू खाडे (गुरूजी) यांचे गुरुवारी (दि.८) अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुलगे, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शनिवार दि. १७ जानेवारी रोजी वणी येथे तर उत्तरकार्य मंगळवार दि. २० जानेवारी रोजी पाटणसई येथील त्यांच्या निवासस्थानी होणार आहेत.

## खालापूरमध्ये एकाच दिवशी ३८ वनराई बंधारे पूर्ण

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर पंचायत समितीच्या माध्यमातून खालापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत हद्दीत एकाच दिवशी तब्बल ३८ वनराई बंधाऱ्यांची उभारणी करण्यात आली. हा उपक्रम मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत श्रमदानाच्या माध्यमातून यशस्वीपणे पार पडला.

या अभियानांतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी प्रत्यक तालुक्यातील ग्रामपंचायत यांना योग्य मार्गदर्शन करून वनराई बंधाऱ्याचे महत्व विषद केले आहे. त्याच अनुषंगाने गट विकास



अधिकारी संदीप कराड यांनी प्रत्येक ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी देऊन कामकाज सुरू केल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. ग्रामपंचायत हद्दीतील सखल भाग, जंगल भाग व दुर्गम परिसरात असलेल्या नाले व ओढ्यांवर वनराई बंधारे उभारून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे.

ग्रुप ग्रामपंचायत चौक, ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली, ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी, ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी, ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ग्रुप ग्रामपंचायत साजगाव यांच्यासह तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायत यांनी लोकसहभागातून या बंधाऱ्यांची बांधणी करण्यात आली.

### स्थानकासाठी १७ जानेवारीला रेल रोको | मध्य रेल्वेच्या व्यवस्थापकांना लेखी निवेदन

# आमटेम रेल्वे स्टेशन निर्माण समिती आक्रमक

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या दिवा ते रोहा या मार्गावरील आणि रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात समाविष्ट असलेल्या मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या आमटेम या गावी रेल्वे स्थानकाच्या प्रलंबित मागणीसाठी आमटेम रेल्वे स्टेशन निर्माण समिती आक्रमक झाली आहे. अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या या मागणीला केंद्रीय रेल्वे मंत्रालय आणि मध्य रेल्वे प्रशासन दाद देत नसल्याने दिवा-रोहा मार्गावरील आमटेम येथील रेल्वे मार्गावर १७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता रेल रोको करण्याचा



इशारा आमटेम रेल्वे स्टेशन निर्माण समितीच्या वतीने मध्य रेल्वेच्या छ. शिवाजी महाराज टर्मिनस येथील कार्यालयातील व्यवस्थापकांना लेखी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

आमटेम रेल्वे स्टेशन निर्माण समितीकडून देण्यात आलेल्या निवेदनानुसार, मध्य रेल्वेच्या दिवा-रोहा या मार्गावर रेल्वे स्थानक व्हावे, ही मागणी रेल्वे प्रशासनाकडे सन १९८६ पासून प्रलंबित आहे. तेव्हापासून सातत्याने पत्र व्यवहाराद्वारे व प्रत्यक्ष भेटून आमटेम येथे रेल्वे स्थानक सुरू करण्याबाबत वारंवार तेथील ग्रामस्थांकडून मागणी करण्यात आली आहे.

आमटेम येथे रेल्वे स्टेशन झाल्यास परिसरातील आमटेम, निगडे, पाबळ, जिर्णे, वरप, शिहू या सहा ग्रामपंचायतीमधील २४ ते २५ हजार लोकसंख्येला याचा फायदा होईल. त्यामुळे या सर्व ग्रामपंचायतींनी तयार केलेले ठराव मध्य रेल्वे प्रशासनाकडे सादर केले होते. मात्र गेल्या अनेक वर्षापासूनची ग्रामस्थांची मागणी रेल्वे प्रशासन टाळत आहे. आमटेम ग्रामस्थांनी २५ डिसेंबर, २०२३ रोजी रेल रोको करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र तुमचा आमटेम रेल्वे स्थानकाचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तुमचे काम लवकरात लवकर होईल, तरी तुम्ही २५ डिसेंबर, २०२३ चा होणारा रेल रोको स्थगित करावा, अशी विनंती पनवेल येथील रेल्वे सुरक्षा सहाय्यक कमिशनर आणि वडखळ पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक यांनी आमटेम ग्रामस्थांना केली होती. त्यांच्या विनंतीला मान देऊन २५ डिसेंबर, २०२३ चा रेल रोको स्थगित करण्यात आला होता.

त्यानंतर वारंवार प्रयत्न करून देखील रेल्वे प्रशासनाकडून आमटेम येथे रेल्वे स्थानक मंजूर करण्यात येत नाही. आमटेमला रेल्वे स्थानक होण्यासाठी रेल्वे प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहे. आमच्या छाताडावरून रेल्वे धावत आहे, पण आम्हाला ती दुरूनच पहावी लागत आहे, रेल्वेत बसून प्रवास करण्याची संधी आम्हाला मिळत नाही, असा आक्रोश ग्रामस्थ करीत आहेत. म्हणूनच आमटेम रेल्वे स्थानक मंजूर करत नसल्याचे निषेधार्थ आमटेम ग्रामस्थांना नाईलाजाने रेल रोको करण्याची वेळ आली आहे. त्यादिवशी जनतेच्या होणाऱ्या गैर सोयीची व परिणामांची जबाबदारी रेल्वे प्रशासनाची असेल, असा इशाराही शेवटी आमटेम रेल्वे स्टेशन निर्माण समितीने आपल्या निवेदनातून दिला आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**११ जानेवारी**

१) श्रीम.संध्या चंद्रकांत आठवले वरसोली-रोड, अलिबाग, दि.११-१-१९५०
२)श्री.गुरूनाथ शंकर साखळकर मु.सारळ, ता.अलिबाग दि.११-१-१९४०
३)श्री.शशिकांत नामदेव कोलते वरसोली, अलिबाग दि.११-१-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**लायन्स क्लब ऑफ अलिबाग**

# खरवली बौद्धवाडी कमानीचा वाद चिघळला



**●ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा**

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील ढालकाठीनिगडे रस्त्यावर नव्याने उभारण्यात येत असलेल्या कमानीवरून वाद निर्माण झाला असून, हा वाद आता अधिक तीव्र झाला आहे. या ठिकाणी कांगोरी गडाची कमान उभारण्यास खरवली बौद्धवाडी ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवित थेट आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. वेळेत निर्णय न झाल्यास उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या मार्गावर सुमारे ५ वर्षांपूर्वी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची कमान उभारण्याबाबत खरवलीकाळीज ग्रामपंचायतीत अधिकृत ठराव मंजूर करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात हा ठराव डावलून दि. ३१ डिसेंबर रोजी संबंधित ठेकेदाराने ढालकाठीनिगडे रस्त्यालगत कांगोरी गड कमानीच्या कामाला सुरुवात केली. या कामाची माहिती मिळताच खरवली बौद्धवाडी येथील ग्रामस्थ सखाराम राया सकपाळ यांनी घटनास्थळी धाव घेत काम तात्काळ थांबवले. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीच कमान होणार असल्याचे त्यांनी ठेकेदारास सांगितले. यावेळी किरकोळ वाद झाला असून अखेर काम बंद करण्यात आले.

दरम्यान, ठेकेदाराकडून मंत्री भरत गोगावले यांच्या सूचनेनुसार या ठिकाणी कांगोरी गडाची कमान उभारण्याचे आदेश आहेत, असा दावा करण्यात आला. मात्र, ग्रामपंचायतीचा अधिकृत ठराव असताना तो डावलून वेगळ्या स्वरूपाची कमान उभारली जात असल्याने बौद्ध समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नसून संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या नावाच्या कमानीसाठी प्राणाची आहुती द्यावी लागली तरी चालेल, अशी तीव्र भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या ठिकाणी तात्काळ कांगोरी गड कमानीचे काम कायमस्वरूपी थांबवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीच कमान उभारावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. जर लवकरात लवकर या मागणीची दखल घेण्यात आली नाही, तर खरवली बौद्धवाडी ग्रामस्थ रस्त्यावर उतरून उपोषणास बसतील, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांच्यावतीने देण्यात आला आहे. या वादाकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कोणती भूमिका घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रामनाथ भगत यांचे निधन

**चिरनेर :** शेलघर येथील रामनाथ भगत यांचे रविवारी (दि.४) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शेलघर येथील स्मशानभूमीत नातेवाईक व ग्रामस्थांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळींच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा शेलघर गावचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत विठ्ठल भगत यांचे ते चिरंजीव, तर शेलघर गावचे अध्यक्ष अमृत भगत यांचे ते बंधू होत. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे. भगत यांच्या निधनाचे वृत्त समजताच आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी अंत्यविधीला उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.१३) श्रीक्षेत्र नाशिक येथे होईल. तर, उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि.१६) शेलघर येथील राहत्या घरी दुपारी बारा वाजता होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.



# पनवेल रेल्वे स्थानकातील भुयारी मार्ग अखेर खुला

**●अपुऱ्या सुविधांमुळे प्रवाशांना त्रास कायम**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्थानकात दिवसभर चाकरमान्यांसह लांब पल्ल्याच्या गाड्यांमधून येणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. पनवेलकडे जाण्यासाठी एकाच उड्डाणपुलावर अवलंबून राहावे लागत असल्याने संभाव्य अनुचित प्रसंग टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने अखेर स्थानकातील भुयारी मार्ग पुन्हा सुरू केला आहे. या निर्णयामुळे नवीन पनवेलकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध झाला असून, प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, प्रत्यक्षात भुयारी मार्गातून मोठ्या प्रमाणावर सामान घेऊन जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जड बॅगा, ट्रॉली तसेच अपुऱ्या सुविधांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. स्थानकात लिफ्ट, रॅम्प किंवा स्वतंत्र व्यवस्था नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांग प्रवाशांचे विशेष हाल होत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी घेतलेला निर्णय स्वागतार्ह असला तरी आवश्यक सुविधा नसल्याने हा निर्णय अर्धवट ठरत असल्याची भावना प्रवासी व्यक्त करत आहेत. इतकी वर्षे हा त्रास सहन करायचा का, असा संतप्त सवाल आता प्रवासी वर्गाकडून उपस्थित केला जात असून, या गंभीर समस्येकडे प्रशासन कधी लक्ष देणार, असा प्रश्न पनवेलकर विचारत आहेत.

# रिक्षावाले पोलिसांचा तिसरा डोळा



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेणच्या चावडी नाक्यावरील रिक्षावाले हे खऱ्या अर्थाने या विभागातील पोलिसांचा तिसरा डोळा आहेत, असे उद्गार पेणचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी काढले. तीनाचाकी रिक्षा चालक मालक संस्था चावडीनाका यांच्याकडून बुधवारी (दि.७) धार्मिक कार्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संदीप बागूल बोलत होते.

सध्यांकाळच्या सत्रात ज्योत्स्नाई म्युझिकल ग्रुप सायली मानकवळे यांच्या सुगम संगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अनिरूध्द पाटील, दिलीप लाड, नगरसेविका संगीता लाड, दिपक गुरव, नगरसेवक संतोष श्रृगांरपुरे, नगरसेवक संजय म्हात्रे, नगरसेवक भुषण कडू, नगरसेविका सुजाता डाकी, विंद्र जाधव, स्वप्निल म्हात्रे, अंतोरा सरपंच अमित पाटील, चंद्रकांत पाटील, अनिस मनियार तसेच डी.वाय.एस.पी जालींदर नालकुन, पोलीस निरीक्षक संदीप बागुल आदींनी सदिच्छा भेट देऊन सुगम संगीताच्या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष अमोल घोटणे, उपाध्यक्ष बंटी नाईक, सचिव बाळा नाईक, खजिनदार प्रफुल्ल जोशी, कार्याध्यक्ष मंदार मोडक यांच्यासह सर्व संघटनेच्या सभासदांनी मेहनत घेतली.

## सुदाम धारपवार बेपत्ता

**रसायनी :** विणेगाव येथील सुदाम धारपवार हे कोठेतरी निघून गेले. याबाबत त्यांच्या पत्नी सीमा धारपवार यांनी खालपूर पोलीस ठाण्यात, ते मनोरुग्ण असून कोणासही काहीएक न सांगता कोठेतरी निघून गेले आहेत, अशी माहिती दिली. याबाबत सुदाम धारपवार हरविल्याची तक्रार खालापूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

# वीर यशवंतराव घाडगे यांचा पराक्रम अमर: कर्नल मोरे





**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ज्या मातीतून जन्म घेऊन एका तरुणाने हसत-हसत मृत्यूला कवटाळले, ज्या छातीवर राष्ट्रध्वजाचा अभिमान घेऊन तो रणांगणात झुंजला, त्या वीर यशवंतराव घाडगे यांचे शौर्य आजही प्रत्येक भारतीयाच्या रक्तात स्फुल्लिंग चेतवणारे आहे. मरणोत्तर 'व्हिक्टोरिया क्रॉस' या सर्वोच्च शौर्यपदकाने सन्मानित झालेल्या या अमर वीराचा पराक्रम आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ आहे, असे भावूक उद्गार कर्नल किशोर मोरे यांनी माणगाव येथे शुक्रवारी (दि.९) आयोजित जयंती कार्यक्रमात काढले.

या कार्यक्रमाला माणगाव तहसीलदार विपीन लोकरे, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, माजी सैनिक संघटना माणगाव-तळा तालुका अध्यक्ष सुरेश गायकवाड, माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी व सभासद आदी मान्यवरांसह नागरिक, महसूल खात्याचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अतिशय तरुण वयात, मृत्यू समोर उभा असताना देखील, देशप्रेमाने भारलेल्या मनाने यशवंतराव घाडगे रणांगणात झेपावले. माझ्या देशासाठी प्राणही कमीच आहेत, हे त्यांनी शब्दांत नव्हे, तर रक्ताने लिहून दाखवले. या पवित्र मातीतून भविष्यात असेच अनेक शूर जवान जन्माला येतील, असा विश्वास कर्नल मोरे यांनी व्यक्त केला. मात्र, ज्यांच्या बलिदानामुळे आपण सुरक्षित आहोत, त्यांच्या स्मरणासाठी आयोजित कार्यक्रमालाच मंत्र्यांनी पाठ फिरवावी, ही बाब उपस्थितांच्या मनाला खोल जखम देणारी ठरली. हा कार्यक्रम भव्य असायला हवा होता. गर्व आणि अभिमानाने भरलेला असायला हवा होता. परंतु, शासनाच्या अनास्थेमुळे आणि पुरेशा निधीअभावी तो साधेपणातच आटोपता आला. किमान पुढील वर्षी तरी, वीर यशवंतराव घाडगे यांची जयंती त्यांच्या शौर्याला, बलिदानाला आणि राष्ट्रप्रेमाला साजेशी साजरी होईल, अशी आशा देखील त्यांनी व्यक्त केली.

# साप्ताहिक राशिभविष्य दि.११ ते १७ जानेवारी २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### आर्थिक नियोजन पूर्ण होईल

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरवातीस विद्यार्थ्यांच्या मनात येणारे नकारात्मक विचार दूर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. तरच सुरवातीस व अखेरीस विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला होऊ शकेल. आठवड्याचे मधले दोन दिवस वगळता बहुतांशी आपले आरोग्य उत्तम राहील. कंबरदुखी असणाऱ्यांनी जड वजन उचलणे टाळावे, हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. आर्थिक नियोजन पूर्ण होऊ शकेल. व्यापारी वर्गाला व्यापाराचे नवे क्षितिज गाठता येईल. घेतलेले निर्णय यशस्वी ठरतील. अमलात आणलेली गुंतवणूक यांचे समीकरण उत्तम जमेल. नोकरदारांना जास्तीचे काम करावे लागले तरी त्याचा योग्य परतावा मिळेल. नियमांचे योग्य पालन केल्यास कामावर पकड बसेल. पैशाचे गणित लाभदायी ठरेल. अनेक क्षेत्रांत आपला आवाज वरचा राहू शकेल. एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन कराल. **महिलांना–** सखेसोबतीसमवेत करमणूक करून आनंद वाढवाल. नात्यातील सलोखा वाढता राहील. मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. जोडीदाराची साथ मिळेल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. प्रकृतीची पथ्ये पाळा. **शुभ दिनांक -११,१२.**

### लोकांचा सहभाग प्रेरणादायी असेल

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांनी आपल्याकडील उपलब्धता बघून बसून न राहता अभ्यासात उत्तम कामगिरी करून वाटचाल करावी. एकूण ग्रहमान पाहता आजूबाजूच्या लोकांचा सहभाग प्रेरणादायी असेल. घराची डागडुजी करून घ्याल. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील. चंद्राचे प्रतिबिंब जसे सुंदर असते तसेच तुम्ही हाती घेतलेल्या कामाचे स्वरूप प्राप्तिकर वाढवणारे असेल. व्यावसायिकदृष्ट्या असलेली सहनशीलता बदलणारी असेल. अनेक माध्यमांतून लाभ होईल. बौद्धिक क्षेत्रात नवे तंत्र आत्मसात होईल. सरकारी कामकाज वेळेवर पूर्ण होईल. नोकर वर्गाला अधिकार प्राप्त होईल. स्वतःच्या कार्यशाळेचा चांगलाच उपयोग होईल. आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होईल. अडचणींची वेळ निभावून निघेल. समाजमाध्यमाद्वारे तुम्हाला ज्या गोष्टी पोहोचवायच्या आहेत त्या व्यवस्थित पोहोचतील. **महिलांना–** मित्रांकडून मिळालेला सल्ला निश्चित यशाकडे नेणारा असेल. भावंडांना होत असलेला त्रास कमी होईल. घरात एखाद्या आवश्यक वस्तूची खरेदी होईल. भक्तिमार्गात सहज गती येईल. **शुभ दिनांक - १३,१४.**

### हा आठवडा विद्यार्थ्यांना अनुकूल

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात हा आठवडा विद्यार्थ्यांना अनुकूल असला तरी त्यांनी इतर प्रवृत्तीत अधिक लक्ष घालू नये. शारीरिक दुखणे कमी होईल ग्रहांची पकड घट्ट राहील. कामात आलेल्या अडथळ्यांचे प्रमाण कमी होऊ लागेल. आगामी काळासाठी केलेला विचार योग्य ठरेल. अपेक्षित फलप्राप्ती वाढलेली असेल. उत्पन्नातील घटते प्रमाण कमी होईल. ग्राहकांची मने वळवण्यास अनुकूलता राहील. नोकरदार वर्गाने अंगलट येणाऱ्या गोष्टींपासून लांब राहावे. जास्तीची जबाबदारी घेताना विचार करा. नियोजनानुसार स्वरूप ठरवा. आर्थिकदृष्ट्या जपून पावले टाका. राजकीय क्षेत्रातील बैठक पार पाडा. तुमचे वक्तृत्व योग्य दिशा दाखवणारे असेल. व्यसनी मित्रांच्या संगतीपासून लांब राहा. पोलीस, मिलिटरी, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रांतील व्यक्तींना धाडसी पराक्रम करावे लागतील. **महिलांना–** इतरांना सल्ला देताना बोलण्यातील जरब धारदार करू नका. कुटुंबातील व्यक्तींची जबाबदारी वाढेल. आरोग्याच्या बाबतीत अजूनही लाल बावटा आहे हे विसरू नका. घाईगडबड व पळापळीने दिनक्रम करू नका. हळुवारपणाने वाटचाल राहू द्या. **शुभ दिनांक - १५,१६.**

### व्यावसायिक स्तरावर मोठी कसरत

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जबाबदारीने उचललेले पाऊल यशस्वीरीत्या पार पडेल. निर्माण झालेल्या प्रश्नातून मार्ग निघेल. नोकरदार वर्गाला परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागतील. ठरलेला दिनक्रम बदलत जाईल. अनपेक्षित मिळालेल्या लाभातून योग्य गुंतवणूक करा. राजकारणातील वातावरण भडक होऊ देऊ नका. सामंजस्याने तोडगा काढा. नात्यातील गैरसमजाची वाढलेली दरी कमी होईल. खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा. चंद्राचे भ्रमण मनाची चंचलता वाढवणारी आहे. तेव्हा सर्वच अपेक्षेप्रमाणे व्हावे. तूर्तास तरी बाजूला ठेवा. व्यावसायिक स्तरावर मोठी कसरत करावी लागेल. सध्या फार मोठी गुंतवणूक करणे टाळा. हिशोबाची नोंद ठेवायला विसरू नका. नोकरीत आकस्मिक घडामोडी होतील. कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करा. अनेक विचार बाजूला ठेवून कार्यमग्न राहा. सामाजिक भान ठेवायला विसरू नका. **महिलांना–** पूर्वी केलेल्या बचतीतून खर्चाचे तंत्र वाढवू नका. वैवाहिक जीवनातील प्रयत्नांना संथ गती मिळेल. कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड राहील. **शुभ दिनांक -११,१७.**

### प्रेम प्रकरणापासून लांब राहा

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांनी अभ्यासात घाई करण्याऐवजी धीराने अभ्यास केल्यास त्यांचा अभ्यास चांगला होऊ शकेल. माहीत नसलेल्या गोष्टींवर न बोलणे केव्हाही चांगले. प्रेम प्रकरणापासून लांब राहा. कुटुंबातील एक मत वाढवण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. या काळात न झेपणाऱ्या गोष्टींसाठी प्रयत्न करणे टाळा. कोर्ट प्रकरणात स्वतहून गुंतागुंत करू नका. कला, साहित्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत स्पर्धा करणे टाळा. व्यवहार क्षेत्रात व्यवहाराच्या नोंदी सूक्ष्म स्वरूपात ठेवा. ग्राहकांची फसवणूक होऊ देऊ नका. नोकरीत कामाव्यतिरिक्त भलताच प्रश्न उभा करू नका. आतापर्यंत पाठीशी असलेले लोक पाठ फिरवत नाहीत ना याचे निरीक्षण करा. मोठ्या खर्चावर वेळीच नियंत्रण आणा. सामाजिक गोष्टीतून नियोजनबद्ध आखणी करून मोठा विकास साधू शकाल. **महिलांना–** संततीच्या आरोग्याची काळजी घ्या. जोडीदाराला सूचणाऱ्या कल्पना प्रगतीचे स्वप्न असेल. कौटुंबिक कार्यक्षमता वाढवा. कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. **शुभ दिनांक - १३,१५.**

### अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. वाढणाऱ्या कार्यशक्तीतून सहज मार्ग स्वीकारा. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य व अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री मिळेल. पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तिगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. व्यवसायिक क्षेत्रात ग्राहकांच्या असलेल्या मागण्या पूर्ण करण्यास वाव मिळेल. उत्पन्न वाढीचे परिणाम चांगले राहतील. उद्योगधंद्यातील आजवरचा असलेला अनुभव महत्त्वाचा ठरेल. **महिलांना–** वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्ट स्वरूपाची राहील. थकवा कमी होईल. बोलण्यात शब्दाची लय बदलू नका. प्रगती उत्तम राहील स्वतःची तब्येत सांभाळून काम करा. **शुभ दिनांक -१२, १४.**

### आर्थिक प्रगती उत्तम राहील

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. नोकरीतील विशिष्ट पदासाठी तुमची निवड करण्यात येईल. अनेक प्रश्नांची मालिका उभी राहणार नाही याकडे लक्ष द्या. हातासरशी वाटणाऱ्या गोष्टी अवघड वाटू लागतील. आर्थिक प्रगती उत्तम राहील. सामाजिक क्षेत्रात थोरामोठ्यांच्या गाठी पडतील. मुलांच्या भविष्यासाठी केलेल्या तरतुदीचा फायदा होईल. एखाद्या मित्राची मोठी जबाबदारी घ्यावी लागेल. भावंडांविषयी किंतु परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. आध्यात्मिक जीवनात दिव्य अनुभूती येईल. तब्येतीत सुधारणा होईल. थांबा, पाहा व पुढे जा हे धोरण राबवा. समस्या कमी होतील ग्रहांची बलवान अवस्था कामातील खाचखळगे कमी करणारे असतील. **महिलांना–** इतरांच्या विचारापेक्षा स्वतच्या बुद्धिकौशल्याचा वापर करा. दैव अनुकूल राहील. ज्यांना मेदवृद्धी व मधुमेहाची समस्या असेल त्यांनी प्रकृतीची अधिक काळजी घ्यावी. घरघुती उपकार करत बसू नये. चांगल्या डॉक्टरचा सल्ला घ्या. घरातील वातावरण सुखकारक राहील. **शुभ दिनांक - १३,१४.**

### मोठ्या नफ्याची अपेक्षा ठेवू नका

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात बुद्धिमत्तेच्या जोरावर व्यवसाय प्रगती साधू शकता. सध्या फार मोठ्या नफ्याची अपेक्षा ठेवू नका. कमीतकमी तोटा सहन करावा लागणार नाही. शनी संघर्षांतून सकारात्मक दृष्टी वाढवेल. किरकोळ गोष्टीतूनसुद्धा समाधान मिळण्याचे संकेत जास्त वाढू शकतात. संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात तुमचा हातखंडा मोठा असेल. नोकरीच्या समस्या कमी होतील. इतरांकडून घेतलेले हातउसने पैसे परत करून जबाबदारीतून बाहेर पडाल. व्यसनी लोकांपासून लांब राहा. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नियोजन जमेल. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. **महिलांना–** या काळात कौटुंबिक कलह निर्माण करू नका. जितके जमेल तितके शांत रहाण्याचा प्रयत्न करा. घरात नवीन वस्तू येईल. बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. धार्मिक कार्यक्रम राबवाल. सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक - १५,१६.**

### लेखनकार्याची आवड निर्माण होईल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचा क्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. कर्जफेड कराल. काही ग्रह योग उत्तम आहेत, त्याचा फायदा घ्या. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. व्यवसायाच्या दृष्टीने आगामी काळाचा अंदाज चांगला येईल. अनुकूलतेची चाहूल लागेल, पण ताटात वाढलेले पदार्थ प्रत्यक्षात तोंडात जाईपर्यंत काही होऊ शकते. नोकरदारांना मिळणारा थोरामोठ्यांचा विश्वासातून चांगल्या गोष्टी घडवण्यासाठी सिद्ध व्हाल. **महिलांना–** भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. वैचारिक मतभेद टाळा. कोणतीही जबाबदारी स्वीकारताना चारी बाजूंनी आवश्यक असणारी खबरदारी घेणे आवश्यक ठरेल. **शुभ दिनांक - १३, १६.**

### स्वतःला चांगले सिद्ध कराला

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कोठेही कायद्याचे उल्लंघन करू नका. नियोजन अचूक असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. स्वतःचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. स्वतःला चांगले सिद्ध करू शकाल. खर्चावर निर्बंध ठेवा. या काळात वादविवादापासून लांब राहा. हा सप्ताह व्यापार–व्यवसायाच्या दृष्टीने अपेक्षित अशा क्षेत्रात जाण्यासाठी सोनेरी पायघड्या टाकणारा ठरेल. नोकरदार व्यक्तीने वरिष्ठांशी असलेले संबंध ताणले जाणार नाहीत याची काळजी घ्या. नियोजनबद्ध केलेल्या कामात हक्काचे यश मिळवता येईल. आर्थिक प्रकरणात सरशी होईल, मात्र खर्चावर निंबध ठेवा. राजकीय क्षेत्रात विशेष प्रयत्न सत्कारणी लागतील. मित्रांसोबत किरकोळ कुरबुरी मोठ्या स्वरूपात करू नका. **महिलांना–** अति तिखट बोलणे टाळा. कोर्ट प्रकरणात शक्यतो कायदेशीर तडजोडीच्या मागे लागा. या सगळ्यातून वाढणारी जबाबदारी विसरू नका. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. **शुभ दिनांक - १५, १७.**

### व्यावसायिक क्षेत्रात चांगली वाढ

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कष्टाचे प्रमाण वाढवावे लागले तरी फायद्याचे प्रमाणही वाढलेले असेल. स्वतःच्या हिमतीवर महत्त्वाचे निर्णय घेऊ शकाल. आठवड्याच्या सुरूवातीस या काळात आपल्या व्यावसायिक क्षेत्रात चांगली वाढ मिळेल. जर आपण नोकरी करत असाल तर तुम्हाला वरिष्ठ आणि कर्मचाऱ्यांकडून खूप पाठिंबा मिळेल आणि जर तुम्ही तुमचा स्वतःचा व्यवसाय चालवत असाल तर तुम्हाला परदेशामध्ये किंवा ऑफशोरमध्ये सामील होण्यासाठी काही नवीन संधी मिळतील. यानंतर, आठवड्याच्या मध्यला स्थिती आपल्यासाठी चांगले परिणाम आणू शकते, कारण या काळात जर नात्यात काही मतभेद असतील तर तो सोडविण्यासाठी हा काळ खूप शुभ ठरू शकतो. याखेरीज, ज्यांना दीर्घकाळ भागीदारीमध्ये व्यवसायात किंवा गठबंधनमध्ये व्यवसाय सुरू करण्याचा विचार आहे त्यांच्यासाठीही हा काळ योग्य ठरू शकतो. **महिलांना–** या वेळी आपल्याला आपल्या आरोग्याकडे योग्य लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्या आरोग्यासाठी योग्य नसलेल्या काही सवयींचा त्याग करण्यासाठी देखील हा काळ चांगला ठरू शकतो. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक - ११,१२.**

### योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात नोकरी करणाऱ्या व्यक्तींना नोकरीत लाभ मिळवून देणारा हा आठवडा आहे. सहकाऱ्यांचे अपेक्षित सहकार्य मिळेल तसेच वरिष्ठांची कृपादृष्टी सुद्धा राहील. व्यापाऱ्यांना सुद्धा आर्थिक लाभ संभवतो. आपण प्रतिस्पर्ध्यांवर मात करू शकाल. सुरवातीस व अखेरीस आपण व्यूहात्मक रित्या वाटचाल करून प्राप्तीच्या नवीन स्रोतांचा विचार कराल. उत्तरार्धात स्वतःसाठी, हौसमौज, वस्त्रे, आभूषणे, मनोरंजन इत्यादींसाठी खर्च होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या मध्यास आपला कार्यभार वाढल्याने थोडा तणाव येऊ शकतो. त्यामुळे कोणताही ठाम निर्णय घेता येणार नाही. हि स्थिती जेमतेम दोन दिवस राहील. प्रणयी जीवनात मागील काही दिवसांपासून आपण ज्या अडथळ्यांचा किंवा प्रतिकूलतेचा सामना करत होता ती आता दूर होईल. आपल्या सामाजिक संबंधातील सानिध्य यश देणारे ठरेल. **महिलांना–** व्यवसायात नवीन संबंध सुरु होण्यास विलंब झाला तरी निश्चितपणे चांगल्या परिणामाची अपेक्षा बाळगू शकता. उत्तरार्धात विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची किंवा विवाहितांना जोडीदाराचा उत्तम सहवास मिळण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक -१४,१७.**

## वाजेकर हायस्कूलमध्ये दिनदर्शिकेचे प्रकाशन

**उरण :** तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात दि. रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सातारा यांच्या दिनदर्शिकेचे औपचारिक प्रकाशन उत्साहात पार पडले. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली दि. रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक ही महाराष्ट्रातील रयत सेवक नोकरांची अग्रगण्य सहकारी बँक म्हणून ओळखली जाते. सध्या बँकेचा एकूण व्यवसाय सुमारे २७०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून, संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यक्षेत्र असलेल्या या बँकेचा निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी फुंडे हायस्कूलचे शाळा समिती अध्यक्ष कृष्णाजी कडू, ॲड. भार्गव पाटील, सल्लागार ॲड. मच्छिंद्र पाटील यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती खालील जमीन मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| अ. क्र. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| १. | ३/१/ब | १.७७.०० | ०.८० | १) कुलवती सगुना<br>२) फुलवती सांबा सीवराव |
| २. | ३/१/क | ०.९२.०० | ०.४१ | १) पब्बति कृष्णा वरप्रसाद<br>२) पब्बति ब्रम्ह रांबा |

तरी वरील मिळकतींमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून, आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ११/०१/२०२६

सही/-
**ॲड.निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट, कचेरी रोड, कर्जत-रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी श्री. संजु सुधीर कोठारी यांचे नावे ७/१२ पत्रकी व हक्क नोंदपत्रकी नोंद असलेल्या मौजे कार्ले तालुका श्रीवर्धन, जि. रायगड या मिळकती खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | कार्ले | १३८ | ०-८४-०० | ०-३ |
| २. | कार्ले | १५५ | ०-९५-४० | ५-५३ |
| ३. | कार्ले | ९४ | ०-२७-०० | ०-०९ |
| ४. | कार्ले | ९७ | ०-५४-०० | ०-१५ |
| ५. | कार्ले | ९९ | ०-१७-०० | ०-०५ |

सदर वरील मिळकती आमचे आशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले असून सदर मिळकती खरेदीबाबत आमचे अशिलांची विद्यमान मालकांचेसोबत बोलणी सुरु आहे. सदर मिळकती निर्वेध, बोजाविरहीत असून सदर मिळकती कोणासही दान, गहाण, फरोक्त, बक्षिस, लिजवर, खरेदीखताने दिलेली नसल्याबाबत व सदर मिळकतींचा कोणाशीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला नसल्याबाबत आणि सदर मिळकतींबाबत कोणत्याही कोर्टात दावे वगैरे दाखल नसल्याबाबत विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना कळविलेले आहे. तरीसुद्धा सदर मिळकतींबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास वा कुणाचीही सदर मिळकतींचे विक्रीव्यवहारास हरकत, अडकाठी असल्यास ही नोटीस दैनिकात प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे अशिलांस खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील यांची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक: १०/०१/२०२६
सदर नोटीस माझे जबाबदारीवर देत आहे.

सही/-
**ॲड. अनिल कृ. पाटील**
बी.कॉम.एलएल.बी.,
ॲडव्होकेट
रा. घर नं. ६३७, हरीष बेकरीच्या मागे,
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड.
फोन : ९७६७३६७२७३

### जाहीर सूचना

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमूद वर्णनाचा वाणिज्य गाळा विद्यमान मालक रिना दिपक जैन, रा. पीएनपीनगर, अलिबाग ता. अलिबाग यांजकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिलांच्या दरम्यान पूर्ण झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील स. नं. ११३/१/ड या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या, एकतानगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चेंढरे या इमारतीमधील तळ मजल्यावरील वाणिज्य गाळा क्र.३, क्षेत्र २२० चौ. फुट, ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्रमांक ९५१/३

संदर्भित वाणिज्य गाळा मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, अखत्यारपत्र, चार्ज, बक्षिस, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन आमची खात्री पटवून दयावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ११.०१.२०२६

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक कार्यालय
अलिबागच्या समोर अलिबाग,
जि. रायगड मो.नं.९८९००७९३०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी श्री.सुनील सुधीर कोठारी यांचे नावे ७/१२ पत्रकी व हक्क नोंदपत्रकी नोंद असलेल्या मौजे कार्ले तालुका श्रीवर्धन, जि. रायगड या मिळकती खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | कार्ले | १३७ | १-३२-०० | ०-३८ |
| २. | कार्ले | १४० | १-४०-०० | ०-४२ |
| ३. | कार्ले | १४१ | ०-६०-०० | ०-२३ |
| ४. | कार्ले | १४७ | ०-४४-०० | ०-१४ |
| ५. | कार्ले | ६४ | १-९७-०० | ०-७४ |
| ६. | कार्ले | ६६ | २-७९-०० | ०-८४ |
| ७. | कार्ले | ६७ | ०-२५-०० | ०-०७ |
| ८. | कार्ले | ९३ | १-८४-०० | ०-५६ |
| ९. | कार्ले | ९५ | ०-२६-०० | ०-०८ |
| १०. | कार्ले | ९६ | २-०४-०० | ०-६२ |

सदर वरील मिळकती आमचे आशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले असून सदर मिळकती खरेदीबाबत आमचे अशिलांची विद्यमान मालकांचेसोबत बोलणी सुरु आहे. सदर मिळकती निर्वेध, बोजाविरहीत असून सदर मिळकती कोणासही दान, गहाण, फरोक्त, बक्षिस, लिजवर, खरेदीखताने दिलेली नसल्याबाबत व सदर मिळकतींचा कोणाशीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला नसल्याबाबत आणि सदर मिळकतींबाबत कोणत्याही कोर्टात दावे वगैरे दाखल नसल्याबाबत विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना कळविलेले आहे. तरीसुद्धा सदर मिळकतींबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास वा कुणाचीही सदर मिळकतींचे विक्रीव्यवहारास हरकत, अडकाठी असल्यास ही नोटीस दैनिकात प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे अशिलांस खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील यांची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक: १०/०१/२०२६
सदर नोटीस माझे जबाबदारीवर देत आहे.

सही/-
**ॲड. अनिल कृ. पाटील**
बी.कॉम.एलएल.बी.,
ॲडव्होकेट
रा. घर नं.६३७, हरीष बेकरीच्या मागे,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.
फोन : ९७६७३६७२७३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत:-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे. आर. चौ.मी | रुपये | पैसे |
| १) अनिल शंकर गटकळ,<br>२) विवेक तानाजी दरेकर,<br>३) गिरीश गोविंद निगडे | ६३ | १ | ३-४४-०० | २३ | २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक १०.१.२०२६

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
**कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड.४१०२०१**
**मो.नं. ९०२८९८२२७७**
**ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - किरवली, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी.चौ.सेमी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| अदिती अनिकेत फक्के<br>शरद दत्तात्रेय फक्के | ७१ | १२ | २.९७.२८ | २९.७३ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ११/०१/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. उत्कर्षा सुरेश सोनावळे**
पत्ता. श्रीसाई सावली अपार्टमेंट, दुसरा मजला, दिवाणी न्यायालया समोर, विठ्ठल नगर, कर्जत ता.कर्जत जि.रायगड.
मो.नं- ९०७५९९५९२८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वासांबे, ता. खालापूर, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | नगर व भूमापन क्रमांक | क्षेत्र आर.चौ.मी. |
|---|---|---|
| ८१/५ | ४०८ | एकूण क्षेत्र २-७९-०० आर.चौ.मी. (२७९ चौ.मी) |
| ८१/६ | ४३९ | एकूण क्षेत्र ४-६६-०० आर.चौ.मी. (४६६ चौ.मी.) |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ११/०१/२०२६

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की आम्ही खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदरहु जमीन ही सदर जमीनीचे विद्यमान मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे दाखल आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मौजे-मुळगांव तर्फे वासरे तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| जमीन मालकांची नांवे | गावाचे नांव | सर्व्हे/हिस्सा नंबर | क्षेत्र-हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| श्रीमती शुभांगी भगवान देशमुख रा-रुम नंबर १०. शिवप्रभा को.ऑप.हौ.सोसायटी, माजीवाडा, ठाणे-४००६०१ | मुळगांव तर्फ वासरे | ४७/१/अ | ०-६९-०० |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, साठेकरार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचे हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आंत खालील सही करणार यांचे पत्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबादार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक - १०/०१/२०२६

सही/-
**श्रीमती रेखा मुकुट बिहारी गुप्ता**
रा-ब्लॉक नंबर २०१. टॉवर नंबर-०७.
सागर दर्शन सीएचएस, प्लॉट नंबर ३८,
पाम बीच रोड, सेक्टर -१८ नेरुळ पश्चिम,
नवी मुंबई. ४००७०६.
मोबाईल नंबर-९८५०६००६४४

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-दामत ता. कर्जत जि. नमूद विद्यमान मालक रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी खालील यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं. | हि. नंबर | क्षेत्र हे.आर.पा. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मोहम्मद जैद समीरुल्लाह चौधरी | ३७ | ४ | ०-४९-७<br>पो.ख. ०-०३-३ | १.५६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे बोर्ली, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) संजय अे बुलचंदानी, २) रवी अे बुलचंदानी, ३) अश्विन अे बुलचंदानी यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| बोर्ली ता.मुरुड | ९७/२ | क्षेत्र ०-८६-५०<br>पो.ख. ०-५०-५०<br>एकुण क्षेत्र १-३७-०० | ०.६८ |

दिनांक : १०/०१/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.रावसाहेब भोपा जाधव, रा.पाली, ता.सुधागड, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौने - खांडपोली, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २१८ | ०-५७-०० | ०.२५ |

पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-२०-०० हे. आर.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्युपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४(चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ११/०१/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेत जमिन मिळकत त्यांचे विद्यमान मालक श्री. मयुर मधुसुदन शिंदे वगैरे १ रा. पुणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या शेत जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मौजे-निकोप, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमिन मिळकत.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|
| २६ | १३ | ०.१५.०० | ०.११ |
| १४ | १४ | ०.१६.०० | ०.१९ |

वरील मिळकत या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे,
दिनांक :- ११/०१/२०२६

सही/-
अशिला तर्फे ॲडव्होकेट
**ॲड.प्रविण गजानन चव्हाण**
मु.डिकसळ, ता.कर्जत,
जि.रायगड
मो. नं. ७७२००६६२१२

**PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY**
Teaching And Non Teaching Staff Required

Prabhakar Patil Education Society is one of the leading Education society, working since 2001. We run various English-medium schools (affiliated with CBSE and the State Board) located at Veshvi (Alibag), Nagaon, Sambari (Kurdus), Vavoshi and Khalapur.

**Requirement :** Principals and Teachers for Pre-Primary, Primary and Secondary Sections and Clerks.

**Subjects:** English, Mathematics, Science, Social Studies, Sanskrit, French, Drawing, Physical Education (P.T.), Karate, Marathi, Hindi.

**Qualification for Teachers :** Post Graduates or Graduates with M.Ed., B.Ed., D.Ed., ECCED, M.P.Ed., or B.P.Ed.

**Qualification for Non Teaching:** Post Graduates or Graduates with excel and accounting experince of minimum 2 years

**Note:** Fluency in English is mandatory.

**Salary Scale:**
Principals : Upto 1,00,000 per month, Teachers: Upto 30,000 per month, Clerks : Upto 25,000 Per Month

(Salary will be commensurate with experience and qualifications.)

**For More Details Please Contact & Apply On:**
Rajashree Patil – 9892150116
Email: pnp.rajashree@gmail.com
Ankit Bhanushali – 9823897088
Email: ankitbhanushali02@gmail.com

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस हया जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे मारळ, ता.श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. व उपविभाग क्र.४ एकूण क्षेत्र ००-४१-३०, आकार ८.९९ लागवड नारळ-सुपारी, पैकी ००.०६.०० इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुधीर केशव मयेकर, सुरेश केशव मयेकर, नरेश केशव मयेकर, सुजन केशव मयेकर, सुबोध केशव मयेकर, सुनील केशव मयेकर सर्व राहणार मु.पो. मारळ, ता.श्रीवर्धन, जि. रायगड. यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : १०/०१/२०२६

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | १४१०/१ | जिरायत ०-२०-१०<br>पो.ख. ०-०५-४०<br>एकुण ०-२५-५० | १.३५ |

वर वर्णन केलेली संपुर्ण जमीन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. प्रकाश आत्माराम पाटील यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, तावा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १०(दहा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे, असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १०/०१/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ७ व ८, ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर, ता.अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बोअरवेल, विहीरीसाठी** इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **शुभमूर्हत विवाह मंडळ** अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवरांची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **प्रथम, पुर्नविवाह** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- **अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी** मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.
- **For office in Alibag** Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549
- **अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे.** (पार्टटाईम अथवा फुलटाईम) संपर्क : ९४२२६९६२३५
- **विकणे आहे :** अलिबाग–कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- **किहीम–चोंढी येथील** हॉटेलमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Cook-Waiter-Helper-etc. 9152990991 Email: csskshirishkar@gmail.com
- **नागाव येथे रिसॉर्ट मध्ये कामासाठी** मुलगा व जोडपे पाहिजे आहे तरी संपर्क साधावा. मोबाईल नंबर.९३७१७१४५५२/९३७१७१४५५६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित वार्ता कानी येईल. व्यवसायात बदलांना अनुकूलता राहील. कौटुंबिक ताण दूर करता येईल.
- **वृषभ** : अनपेक्षित घटनांनी विचलित व्हाल. पुरेसा संयम बाळगावा. ज्येष्ठांचं मार्गदर्शन अवश्य घ्यायला हवं.
- **मिथुन** : बेरोजगारांना अपेक्षित दिलासा मिळेल. जुनी येणी वसूल होतील. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील.
- **कर्क** : आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल.
- **सिंह** : महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावे. दूरचे प्रवास सध्या टाळावेत. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल.
- **कन्या** : व्यवसायात नवी आव्हानं समोर येतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. विचारानं रहायला हवं.
- **तूळ** : प्रलंबित कामांना गती मिळेल. नव्या योजना मनासारख्या मार्गी लागतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **वृश्चिक** : गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. स्वमताग्रह टाळायला हवा. अनपेक्षित घटनांनी चिंता राहील.
- **धनु** : भावंडांचं उत्तम सहकार्य राहील. व्यवसायात विशेष अनुकूलता राहील. स्थावर प्रश्नातून मार्ग निघेल.
- **मकर** : अनावश्यक खर्च टाळायला हवा. भागीदारी व्यवसायात वाद संभवतात. पित्ताचे विकार संभवतात.
- **कुंभ** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. कामांना अपेक्षित गती मिळेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मीन** : थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल.

मेक अप मंत्रा

## सौंदर्यप्रसाधनांचा असाही वापर

* वापरात नसलेली चमचमती आयशॅडो नेलपॉलिशमध्ये घाला. क्लिअर नेलपॉलिश घ्या. त्यात ही आयशॅडो टाका. मस्त नेलपॉलिश तयार होईल.

* वापरात नसलेला कंडिशनर टाकून देण्याऐवजी वॅक्सिंग किंवा शेव्हिंग करण्याआधी अंगाला लावा. यामुळे अंगावरची लव मऊ होईल आणि महागडा कंडिशनर टाकून द्यायची वेळ येणार नाही.

* लिप बामचा उपयोग होत नसेल तर तो चक्क भुवयांना लावा. यामुळे भुवया नीट सेट होतील आणि छान दिसतील.

* चेहऱ्याला लावायचा मॉईश्चरायझर पायांना किंवा मानेला लाऊन संपवून टाका.

* मस्कारा तीन ते सहा आठवडेच चालतो. कालावधी संपलेल्या मस्काराचा वापर लिप स्क्रब म्हणून करता येईल. या मस्कारात नॅचरल ऑईलचे काही थेंब टाका आणि लिप स्क्रबिंगसाठी त्याचा वापर करा.

* वापरात नसलेले स्कीन टोनर्स काचा, मोबाईल, लॅपटॉपचे स्क्रीन्स पुसण्यासाठी वापरता येतील.

## ११ जानेवारी

दिनविशेष

- **१९४४** : काऊंट सिअनो या मुसोलिनीच्या जावयास मुसोलिनीच्या आज्ञेवरुन फितूर म्हणून मारण्यात आले. तो इटलीचा परराष्ट्रमंत्री होता.
- **१९५४** : चंद्रकांत भोंजाळ या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी अनुवादकाचा जन्मदिन.
- **१९६६** : भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री ताश्कंद करारासाठी रशियाला गेले असताना आकस्मितरित्या मृत्यू पावले.
- **२०१३** : डॉ. अनिल काकोडकर यांचा महाराष्ट्रभूषण पुरस्काराने गौरव.

स्मार्ट टिप्स

## व्हायरस घालवण्यासाठी...

लोगो आल्यावर व्हॉल्यूम बटण खालच्या बाजूने दाबा. यानंतर फोनच्या स्क्रीनवर खालच्या बाजूला सेफ मोड हे शब्द दिसतील.

व्हायरस काढून टाकण्यासाठी सेटिंग्जमधून ॲप्समध्ये जा. इथे डाउनलोड हा पर्याय निवडा. आता फोनमधली सगळी ॲप्स दिसतील. यापैकी तुम्ही डाउनलोड केलेली ॲप्स कोणती आहेत ते बघा. या यादीत भलतंच एखादं ॲप दिसलं तर अनइन्स्टॉल करून टाका. यामुळे फोनमधला व्हायरसही निघून जाईल.

सेफ मोडमधून बाहेर पडण्यासाठी फोनचं पॉवर बटण दाबून रिस्टार्टचा पर्याय निवडा.

या नंतरही फोनचा वेग वाढला नाही तर फॅक्टरी रिसेटचा पर्याय आहे. पण याआधी फोनमधली महत्त्वाची माहिती, फोन नंबर, फोटो, व्हिडिओ हे सगळं नीट सेव्ह करून ठेवा. फॅक्ट्री रिसेट केल्यानंतर तुम्हाला हवी असणारी ॲप्स पुन्हा डाउनलोड करावी लागतील.

## पंचांग

**रविवार, ११ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष कृ. ८, चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : चित्रा, योग : सुकर्मा,
सूर्योदय ७.१६, सूर्यास्त ६.१७

## फॉरवर्डस

**साल आसान नहीं थां मग़र सबक़ ग़हरा दें ग़या यारों...**

**टूटकर भीं कैसें खड़ा रहना हैं ये सिखा ग़या...!**

आरोग्यमंत्र

## प्या कढीपत्त्याचा चहा

बहुतेक लोक विविध पदार्थांमध्ये भरपूर प्रमाणात कढीपत्ता वापरतात. कढीपत्ता जेवणाची चव वाढवण्याचे काम करतो. प्रामुख्याने सांबार, आमटी, भाज्या इत्यादींमध्ये कढीपत्ता वापरला जातो. एवढेच नाही तर लोक कढीपत्त्याचा रसही पितात. पण कढीपत्त्यापासून बनवलेला चहा अत्यंत आरोग्यसंपन्न असतो हे तुम्ही जाणता का? होय, कढीपत्त्यापासून तयार केलेला चहा आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. कढीपत्त्यात अनेक प्रकारचे पोषक तत्त्व असतात जे अनेक प्रकारच्या शारीरिक समस्यांपासून आपला बचाव करतात. म्हणूनच कढीपत्त्याचा चहा पिण्याचे फायदे जाणून घेऊ या. कढीपत्त्यात लोह, फॉस्फरस, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए (कॅरोटीन), व्हिटॅमिन सी इत्यादी अनेक प्रकारचे पोषक घटक असतात. व्हिटॅमिन सी रोगप्रतिकार शक्ती मजबूत करते. त्यामुळे कढीपत्त्याचा चहा पिणे अत्यंत फायदेशीर ठरू शकते. दक्षिण भारतात कढीपत्ता जास्त वापरला जातो. मात्र, आता बहुतांश लोकांनी त्याचा वापर सुरू केला आहे. कढीपत्त्याचा उपयोग फक्त फोडणी देण्यासाठीच होत नाही तर या औषधी वनस्पतीपासून बनवलेला चहा अनेक आरोग्यदायी फायदे देतो. कढीपत्त्याचा चहा प्यायल्याने पचनक्रिया निरोगी राहते. त्यात सौम्य रेचक गुणधर्म आणि पाचक एंजाइम असतात. त्यामुळे आतड्याची हालचाल सुधारते. सहाजिकच पचनक्रियाही सुधारते.



## वेगळ्या वाटा

इंजिनिअरींग आणि मेडिकलनंतर बँकिंग क्षेत्राकडे युवकांचा कल बघायला मिळतो. उत्तम पगार, कामाच्या सोयीच्या वेळा, पुढे जाण्याची संधी यामुळे युवावर्ग बँकिंगकडे आकर्षित झाला तर आश्चर्य वाटायला नको. बँक प्रोबेशनरी ऑफिसरच्या नोकरीला बरंच वलय आहे. पदवीधर युवक–युवती बँकांच्या परीक्षा देण्यावर भर देतात. देशात बँकिंग क्षेत्र वेगाने वाढतंय. या क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना उत्तम सोयीसुविधा मिळतात. कौशल्य असेल तर उच्च पदावर जाता येतं. आर्थिक स्थैर्य मिळतं. मानसन्मानही मिळतो.

(क्रमशः)

## वजन कमी करायचंय?

फिटनेस मंत्रा

दोस्तांनो, आजकाल वजन वाढलं की चिंता वाटू लागते. त्यातच वजन कमी करण्यासाठी अनेकांकडून अनेक सल्ले मिळतात. अशा परिस्थितीत व्यायामाला सुरूवात करताना वजन कमी करण्यासाठी काय करायला हवं, ट्रेडमिलवर किती वेळ चालायला हवं, नेमकं काय खायला हवं असे प्रश्न पडू लागतात. त्यांची उत्तरं जाणून घेऊ...

* कार्डिओमुळे वजन कमी होत असलं तरी फक्त कार्डिओवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यात बरंच वजन कमी करायचं असेल तर फक्त कार्डिओ करून भागणार नाही. धावणं, सायकलिंगसारखे व्यायामप्रकार सातत्याने करत राहिल्यास शरीर या तुलनेने कमी तीव्रतेच्या व्यायामप्रकारांशी जुळवून घेतं आणि कमी कॅलरी खर्च होतात.

* वजन लवकर कमी करायचं तर किक बॉक्सिंग, स्प्रिंटिंगसारखे अधिक तीव्रतेचे कार्डिओ व्यायाम करता येतील. यामुळे स्ट्रेंथ ट्रेनिंग होतं आणि वजन कमी करण्याला गती मिळते.

* वजन कमी करायचं म्हणून अतिव्यायाम करू नये. शरीराला विश्रांती न देता सतत व्यायाम केल्याने शारीरिक आरोग्य धोक्यात येतं. मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. स्नायूंमध्ये वेदना, भूक मंदावणं, डोकेदुखी, रोगप्रतिकारकक्षमता कमी होणं हे परिणाम दिसून येतात.



खेचाखेची

## मट्ठा पाहिजे होता

लोक काय म्हणतील, याचा जास्त विचार करू नका ...

लोक तुमच्या तेराव्यालासुद्धा म्हणतील,

.
.
.
.

ऊन जास्त आहे ...
मट्ठा ठेवायला पाहिजे होता...

## वेगळं काही

जपानमधल्या एका रेस्तराँ मालकाने एका लिलावात ट्यूना जातीचा मासा तीन दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त किंमतीला विकत घेतला. कियोशी किमुरा असं या व्यक्तीचं नाव आहे. कियोशीने २७८ किलो वजनाच्या या माश्यासाठी ३३३.६ दशलक्ष येन मोजले. जपानमध्ये बऱ्याच वर्षांपासून अशाप्रकारे माश्यांचा लिलाव होतो. कियोशी सातत्याने सर्वाधिक बोली लाऊन मासे खरेदी करतो. २०१७ पर्यंत सलग सहा वर्ष सर्वाधिक बोली लावून मासा खरेदी करण्याचा विक्रम त्याच्या नावे होता. पण मध्यंतरी दुसऱ्या एका मालकाने त्याच्यापेक्षा जास्त बोली लावून मासा विकत घेतला. पण यंदा कियोशीने पुन्हा मुसंडी मारली आणि सर्वाधिक बोली लावली.

## ब्रेक के बाद

करिअरवाटा

अनेक महिलांना मुलं लहान असताना करिअरमधून ब्रेक घ्यावा लागतो. तर काही महिला मुलं मोठी झाल्यानंतर करीअर सुरू करतात. पण तोपर्यंत वयाची तिशी उलटून जाते. अर्थात नवी सुरूवात करताना वय कधीच आड येत नाही. तुम्हालाही काम आणि घर यांचं संतुलन साधत अर्थार्जन करायचं तर या पर्यायांचा विचार करा.



* 'कंटेंट रायटिंग'च्या क्षेत्रात संधी आहेत. लेखन कौशल्य असणाऱ्यांनी विचार करावा. इंग्रजीसह हिंदी किंवा मराठीत लेखन करता येईल. टायपिंगचं कौशल्य असल्यास छान करीअर करू शकता.

* पदवीधर, द्विपदवीधर महिला ब्रेकनंतर शिक्षणाच्या क्षेत्रात करीअर करू शकतात. जवळच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करता येईल तसंच घरच्या घरी शिकवण्या घेता येतील. मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृतसारख्या भाषांचं ज्ञान असेल तर या विषयांची शिकवणी घेऊ शकता.

* सुगरण महिला 'फूड ब्लॉग' तयार करू शकतात. यू ट्यूबवर स्वतःचं चॅनलही काढता येईल. तुमच्या हटके रिसिपींची माहिती इतरांना द्या आणि जाहिरातींच्या माध्यमातून उत्पन्न मिळवा.

## सुडोकू ५३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | ३ | | ६ | | |
| १ | ५ | २ | | ४ | | | | ३ |
| | | | १ | | ५ | | | |
| ५ | ८ | | | | ६ | | | ९ |
| | | | ७ | | ४ | | | |
| ३ | | | ८ | | | | ५ | ७ |
| | | | ४ | | १ | | | |
| ४ | | | | ६ | | ३ | ७ | २ |
| | | ९ | | २ | | | | १ |


टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ५ | १ | ७ | ६ | २ | ८ | ४ | ३ |
| ८ | ३ | २ | ९ | ५ | ४ | ६ | १ | ७ |
| ७ | ४ | ६ | ३ | १ | ८ | ५ | ९ | २ |
| ३ | ७ | ५ | १ | ४ | ६ | ९ | २ | ८ |
| ४ | २ | ९ | ५ | ८ | ७ | ३ | ६ | १ |
| १ | ६ | ८ | २ | ३ | ९ | ७ | ५ | ४ |
| २ | १ | ३ | ६ | ७ | ५ | ४ | ८ | ९ |
| ६ | ८ | ४ | ४ | ९ | १ | २ | ३ | ५ |
| ५ | ९ | ४ | ८ | २ | ३ | १ | ७ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक ५३




**आडवे शब्द :-**
१) फार मोठा फायदा
५) मालकी हक्क
७) मर्यादा
१०) प्रामाणिक मनुष्य
११) वडाचे झाड
१२) एक पालेभाजी
१४) गव्हाचे पीठ
१५) ओंगळ माणूस, अस्वल
१७) गाढव, गर्दभ
१८) गळा
१९) पिशाचासाठी ठेवलेले अन्न
२१) हत्तीचा शिक्षक
२२) मयूर
२३) सदन
२५) आकाश
२७) प्रतिष्ठा
२८) नवरा, कुटुंब प्रमुख
२९) नकला करणारा
३१) अज
३३) मध्यस्थ
३७) झाडाची पाने
३८) तृण
३९) चणचण
४०) वरपांगी
४१) बिनावासाचे पांढरे फूल
४४) कमी बोलणारा
४५) भरभराट
४८) वर्षानुवर्षे
५०) जरब, भीती
५१) वेदना
५२) चौक
५४) पुरुषजात
५६) बातमीदार
५८) मागणी पूर्ण होण्यासाठी केलेली व्रतवैकल्ये
६१) भयंकर अपराध, जीवाला लागलेली काळजी
६२) महिरप
६३) प्रस्थान करणे
६४) शेळीचे पिल्लू.

**उभे शब्द :-**
१) अवघड, साध्य न होणारे
२) बारीक व मऊ केस
३) तमाशातील शृंगारीक शब्द
४) गावभर भटकणारी
५) सही
६) कातडी
७) एक चतुर्थांश भाग
८) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
९) रसाने भरलेले
१३) जाणता अजाणता
१४) कशा प्रकारचा?
१६) सारखा
१८) छातीतून निघणारा शेवटच्या श्वासाचा आवाज
२०) सत्वांश
२३) मृत्यू
२४) स्टेशनला मराठी शब्द
२६) बरवा, चांगला
२७) अनुमती
३०) नहर
३१) बोलण्यात मेळ नसणे
३२) डोंगरा तुटून पडलेला भाग
३४) औषध
३५) अवहेलना
३६) प्रचंड लांबीचा एक मासा
४२) विटी कोलण्याचा लहान खड्डा
४३) पाठीला आलेली वक्रता
४४) अशा प्रकारचा
४५) निरर्थक बडबड
४६) सिद्ध
४७) नाहक
४९) डोळे, नेत्र
५३) तम, अंधार
५५) पृथ्वी
५७) उपस्थित
५९) गणितामधील उणे
६०) प्रहर

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



**दोन दशकानंतर उद्धव आणि राज ठाकरे भाऊबंदकी विसरून 'ठाकरे ब्रँड'चे अस्तित्त्व टिकवण्यासाठी एकत्र आल्याने महापालिकांच्या निवडणुकीमध्ये, विशेषतः मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये रंग भरले असून जोरदार चुरस निर्माण झाली आहे. अर्थातच भाजपने हे लक्षात घेऊन शिंदेसेनेसह जोरदार तयारी आरंभली आहे. त्यांची ही युती राज्याच्या राजकारणात काय चमत्कार करणार, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.**

# ठाकरेंचे मनोमिलन रणात भरतेय गहिरे रंग!

जनार्दन पाटील



भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या प्राथमिक शाळांमध्ये हिंदी लादण्याच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी दोन्ही ठाकरे एकत्र आले. त्यानंतर राज आणि उद्धव यांना मुंबई महापालिकेची सत्ता कायम ठेवण्यासाठी आणि इतर महानगरपालिका निवडणुकांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी युती निवडणुकीपर्यंत वाढवणे आवश्यक आहे, असे वाटले. दोघांनीही एकत्र येण्याचे गांभीर्य आणि महत्त्व ओळखले. गेल्या दोन दशकात दोन भावांनी एकत्र यावे, यासाठी अनेक प्रयत्न झाले. त्यांच्या मामांनीही प्रयत्न केले; परंतु त्यात त्यांना यश आले नव्हते. भाजपने 'ठाकरे ब्रँड' संपवण्याची भाषा वापरल्याने दोन भावांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. मनसे आणि शिवसेनेच्या युतीची घोषणा दणक्यात झाली. मुंबई, ठाण्यासह महाराष्ट्रातील मराठी माणसाची अनेक वर्षांची इच्छा पूर्ण झाली. आता ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर मुंबई, महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी मिळेल. ठाकरे बंधूंच्या एकीकरणाचा भाजपला फटका बसणार का, मराठी माणसाची एकजूट करण्यात ठाकरे बंधू यशस्वी ठरणार का, उद्धव मुंबईचा गड राखणार का यासारखे अनेक प्रश्न या निमित्ताने चर्चेच्या भोवऱ्यात आले आहेत. राज आणि उद्धव यांच्या एकत्र येण्याने महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा मिळणार, यात शंकाच नाही. मुंबई महानगरपालिका, ठाणे, कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत याच सर्वाधिक प्रभाव दिसेल. राज आणि उद्धव एकत्र येण्याने मराठी माणूस एकवटेल, असे अनेक तज्ज्ञांकडून सांगण्यात येते; पण दोन्ही भावांमुळे मतांचे ध्रुवीकरण किती थांबणार, हे तपासणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

राज आणि उद्धव यांच्या एकत्र येण्याने मराठी मतदारांची विभागणी थांबेल असे म्हटले जाते. शिवसेना (यूबीटी) आणि मनसेची मतसंख्या वाढेल असेही सांगण्यात येत आहे. एकनाथ शिंदे यांनी साथ सोडल्यानंतर उद्धव यांच्या शिवसेनेची ताकद कमी झाली होती. अनेक आमदार, खासदार आणि कार्यकर्त्यांनी ठाकरे यांना 'जय महाराष्ट्र' केला. त्यात विधानसभेनंतर ठाकरे यांच्या शिवसेनेला गळती लागली होती. त्यामुळे ठाकरे यांचा मुंबईचा गड कोसळणार, अशीच स्थिती निर्माण झाल्याचे म्हटले जात होते; पण ठाकरे बंधू एकत्र आल्याने भाजप आणि शिंदेसेनेला कडवे आव्हान मिळू शकते. मराठी मतांच्या जोरावर दोन्ही भाऊ पुन्हा एकदा मुंबई महापालिकेवर झेंडा फडकवण्यासाठी रणनीती आखात आहेत. राज आणि उद्धव हे दोन्ही बंधू बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत तयार झाले आहेत. दोन दशकांपूर्वी राज यांनी वेगळी चूल मांडली होती; पण आता दोन्ही बंधू पुन्हा एकत्र आल्याने मराठी माणसाच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. राज आणि उद्धव यांच्या एकत्र येण्याने बाळासाहेबांच्या शिवसेनेची जुनी ओळख परत येईल का, याचे उत्तर आता १६ जानेवारीला समजू शकेल. राज आणि उद्धव गेल्या दोन दशकांपासून वेगळे लढत होते. त्यामुळे मराठी माणसांच्या मतांची विभागणी होत होती. आता एकत्र आल्याने पुन्हा एकदा दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते एकत्र येतील. त्यामुळे मतांचे ध्रुवीकरण थांबेल. याचाच फायदा मतपेटीत दिसू शकतो. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना एकत्र काम करण्याची संधी मिळेल. त्यामुळे प्रचार अधिक प्रभावी होईल. वस्तुतः राज यांच्यामुळे ठाकरे युतीकडे येऊ शकणारी परप्रांतीय मते दुरावली जाण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा जन्म झाला. त्या वेळी केंद्रस्थानी उद्धव हेच होते. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा बदल झाला. आता पुन्हा एकदा राज्यात नव्या युतीचा जन्म होतो. आताही केंद्रस्थानी उद्धव हेच आहेत; पण आता उद्धव यांच्यासोबत राज आहेत. ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्याने मुंबईसह राज्याच्या राजकारणात नवे समीकरण तयार होईल. कदाचित भाजपला आपली रणनीती बदलावी लागेल. ठाकरे बंधू सध्या फक्त सहा ते सात महापालिकेत एकत्र लढणार आहेत; पण या निवडणुकीत दोन्ही भावांना चांगले यश मिळाले, तर राज्यात ठाकरे यांचा प्रभाव नक्कीच वाढेल. मागच्या काही निवडणुकांमध्ये राज यांच्या मनसेला मते मिळालेली नाहीत. २०२५ मध्ये राज यांचा एकही आमदार निवडून आला नाही. राज यांना स्वतंत्रपणे फारशी मते मिळत नसल्याचे मागील पाच वर्षांमध्ये दिसून आले. त्यातच परप्रांतियांविरोधात राज यांची आक्रमक भूमिका आहे. यामुळे उद्धव यांच्यापासून मुस्लिम आणि परप्रांतीय मते दुरावली जाऊ शकतात, हा धोका आहे. दोन्ही ठाकरेंच्या कट्टर मराठी धोरणामुळे मुंबईतील उत्तर भारतीय, गुजरातीसह इतर परप्रांतीय मते महायुतीकडे वळण्याची शक्यता आहे. राज-उद्धव एकत्र आल्याने महाविकास आघाडीमध्ये फूट पडली आहे. कारण राज यांच्या धोरणाला काँग्रेसने नेहमीच विरोध केला आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्याने मुंबईतील मराठीबहुल मतदारसंघांमध्ये निश्चित दोन्ही पक्षांना जिंकून यायला वाव आहे. त्यांना त्याचा फायदाही होईल; परंतु उर्वरित मुंबईत जिथे मोठ्या संख्येने हिंदी भाषिक आहेत किंवा जिथे हिंदी भाषिक निर्णायक आहे, अशा भागांमध्ये दोन्ही पक्षांची काय रणनीती आहे किंवा काय भूमिका आहे हे मात्र अस्पष्ट आहे. मुंबईतील आतापर्यंतचे पारंपरिक 'व्होटिंग पॅटर्न' पाहता मुंबईतला मराठी मतदारही विभागला गेला आहे. हिंदुत्ववादी मते पूर्वी शिवसेना-भाजपच्या युतीला जात होती. ती आता भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या युतीकडे राहतील. यामुळे शिवसेना ठाकरे गटाची पारंपरिक मराठी मते वगळता युतीतली हिंदी भाषिक मते आता उद्धव यांच्याकडे कायम राहण्याची शक्यता कमी आहे. शिवाय गुजराती, जैन हा भाजपचा पारंपरिक मतदार मानला जातो. उत्तर भारतीय आणि इतर प्रांतीय मते ही भाजप आणि काँग्रेस यांच्यात विभागली जातील, तर मुस्लिम आणि दलित मते काँग्रेसची पारंपरिक मते मानली जातात. यात वंचित बहुजन आघाडीलाही मते मिळतात. या निवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेस स्वबळावर लढत आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे स्वबळावर लढणार, की कुणासोबत आघाडी करणार हे अद्याप स्पष्ट होत आहे. आजघडीला मराठी मतदार ठाकरे बंधूंना एकगठ्ठा मतदान करेल असे सांगता येत नाही. शिवाजी पार्क, माहीम या भागात राहत असलेला उच्च मध्यमवर्गीयदेखील सध्या भाजपच्या बाजूने दिसतो, तर आर्थिकदृष्ट्या गरीब मतदारांना विविध प्रकारची आमिषे दाखवली जाऊ शकतात. बाळासाहेब ठाकरे, शिवसेनेवर प्रेम, विश्वास असलेले कट्टर मतदार ठाकरे बंधूंच्या युतीला मतदान करतील. दुसरीकडे, भाजप सत्तेत असल्याने अधिक ताकदवान आहे. मुंबईतल्या विकासकामांचे श्रेय हा पक्ष घेईल, त्याची जाहिरातबाजी करेल आणि पारंपरिक मतदारांसोबत नवीन मतदारांनाही भुरळ पडू शकेल. आता मुंबईतील मतांचे गणित पाहिल्यावर ठाकरे बंधूंच्या युतीचा फायदा नेमका कोणाला होणार, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दोन ठाकरे एकत्र आले तरी आव्हाने बरीच आहेत. २०१७ च्या निकालानुसार, भाजपचा 'व्होट शेअर' २७ टक्के होता. त्यावेळी शिवसेना अखंड होती आणि दोन्ही पक्षांची युती हेती. राज ठाकरे यांचा 'व्होट शेअर' ७.५ टक्के होता. शिवाय, मनसेचा 'व्होट शेअर' अनेक वर्षांपासून टिकून आहे. यामुळे शिवसेना दोन गट झाले असले, तरी राज यांचा 'व्होट शेअर' त्यांच्याकडे वळू शकतो. मुंबईत २२७ प्रभांगापैकी जवळपास १५० जागांवर मराठी मतांचा प्रभाव आजही आहे. ही मते कोणाच्या पारड्यात पडतात, त्याचा काही पॅटर्न बनतो का, यावर पुढील चित्र अवलंबून असणार आहे. **

---

# 'लिंकर सर' म्हणजे ....इंग्रजीच्या गुणवत्तेचं चालतं बोलतं 'विद्यापीठ'!

धनंजय शेटये



आजच्या 'स्मार्ट' युगात शिक्षणाची व्याख्या बदलली आहे. पण नव्वदीच्या दशकात शिक्षण म्हणजे केवळ पाठांतर नव्हतं, तर तो संस्कारांचा एक सोहळा होता. आजही मागे वळून पाहताना अशा काही व्यक्तिमत्वांचे चेहरे डोळ्यासमोर येतात, ज्यांनी केवळ पुस्तकं शिकवली नाहीत, तर आयुष्य जगायची शिस्त लावली. वराडकर हायस्कूल कट्टा येथील अशाच दोन महान गुरुंची जोडी म्हणजे श्री. लिंकर सर आणि श्री. सुतार सर.लिंकर सरांचा शाळेत आदरयुक्त दरारा होता. शिस्तीचे दुसरे नाव म्हणजे लिंकर सर!

नव्वदीच्या दशकात ज्यांचं नाव ऐकताच विद्यार्थ्यांच्या काळजात धडधड व्हायची, ते नाव म्हणजे लिंकर सर! त्यांना आम्ही 'इंग्रजी भाषेचे विद्यापीठ' मानायचो. ग्रामीण भागातील मुलांसाठी इंग्रजी म्हणजे परक्या देशातली वाटणारी भाषा. पण सरांनी हीच भाषा आमच्या गळी उतरवली. ''काल अभ्यास काय दिला होता?'' हे त्यांचे पाच शब्द वर्गात उच्चारले गेले की, तिथे टाचणी पडली तरी आवाज येईल इतकी शांतता पसरायची.सरांच्या हातचा प्रसाद (मार) खाल्ला नाही असा विद्यार्थी विरळाच! पण तो मार म्हणजे रागाचा अविष्कार नव्हता, तर आमच्या उज्ज्वल भविष्याची ती पायाभरणी होती. त्यांच्या कडक शिस्तीमुळेच आज आम्ही आयुष्याच्या परीक्षेत उभे राहू शकलो आहोत. इंग्रजीचे 'द्रोणाचार्य' आणि गणिताचे 'तेंडुलकर'लिंकर सरांचा इंग्रजी व्यासंग अगाध होता. विशेष म्हणजे, हुशार मुलांपेक्षाही 'तळागाळातील' आणि अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्याला समजलं पाहिजे, हा त्यांचा अट्टाहास असायचा. त्याकाळी इंग्रजी आणि गणित हे दहावीच्या निकालाचे खरे शत्रूकाम असायचे. पण वराडकर हायस्कूलमध्ये चित्र वेगळं होतं.

लिंकर सर इंग्रजीचे 'द्रोणाचार्य' होते, तर त्यांना साथ देणारे सुतार सर गणिताचे 'सचिन तेंडुलकर' होते! सुतार सर गणित इतक्या सोप्या पद्धतीने शिकवायचे की भीती पळून जायची. ही 'जय-वीरू'ची जोडी सकाळी ९:३० वाजल्यापासूनच शाळेत हजर असायची. आजच्या कोचिंग क्लासेसच्या युगात त्याकाळी हे दोन ऋषीवर्य विनामूल्य आमची गुणवत्ता वाढवण्यासाठी झटत असत.

आदर्श व्यक्तिमत्त्व आणि ती खास 'शैली' लिंकर सरांची राहणी अत्यंत साधी पण विचार उच्च होते. कडक इस्त्रीचे कपडे आणि त्यांच्या फुल शर्टचे हात दुमडण्याची ती खास शैली... आजही ती आठवली की अंगावर काटा येतो. बाह्या दुमडल्या की समजायचं, आता कोणाची तरी खैर नाही! त्यांच्या एन्ट्रीतच असा काही 'क्लास कंट्रोल' असायचा की शिक्षकांनी 'अभ्यास करा' असं सांगण्याची गरजच उरायची नाही. मुलं आपोआप अभ्यासात गर्क व्हायची.

ऋणातून उतराई होण्यासाठी... आज मी स्वतः पन्नाशीच्या उंबरठ्यावर आहे आणि शिक्षण क्षेत्रात १८ वर्षांपासून कार्यरत आहे. एक अत्यंत गरीब, मोलमजुरी करणाऱ्या आई-वडिलांचा मुलगा आज जर 'शिक्षक' म्हणून ताठ मानेने उभा असेल, तर त्याचं सर्व श्रेय लिंकर सरांसारख्या रत्नांना जातं. त्यांनी शिकवलेली प्रामाणिकपणाची आणि शिस्तीची मूल्ये आजही माझ्या जगण्याचा भाग आहेत. कधीकाळी सरांचा राग यायचा, पण आज जाणवतं की, ते रागावणं म्हणजे एक संस्कार होता. आपल्या गुरूंनी दिलेल्या ज्ञानाच्या ५ टक्के जरी मी माझ्या विद्यार्थ्यांना देऊ शकलो, तरी मी माझं भाग्य समजेन. लिंकर सर हे माझ्यासाठी केवळ शिक्षक नसून ते एक दैवत आहेत.लिंकर सरांनी आत्मविश्वास दिला, हिंमत दिली, जीद्द दिली. संकटांशी लढण्याची ताकत दिली. असे शिक्षक पुन्हा होणे नाही! अशा महान गुरूंना कोटी कोटी प्रणाम. **

---

# एअर इंडियाच्या महाराजाचा जन्म पनवेलचा

सुधाकर लाड

भारतीय हवाई क्षेत्राचे जनक जहांगीर रतनजी दादाभाई टाटा (जेआरडी टाटा) यांनी १५ ऑक्टोबर १९३८ ला सुरू केलेल्या 'टाटा एअर लाईन' चे भारत सरकारने १९५३ मध्ये राष्ट्रीयकरण केले. त्यामुळे भारत सरकारच्या मालकीची 'एअर इंडिया' ही कंपनी झाली. या कंपनीच्या 'बोध चिन्हासाठी' १९५६ च्या दरम्यान टाईम्स ऑफ इंडिया व अन्य वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली ही जाहिरात वाचून पनवेलमधील शिल्पकार जगन्नाथ गणेश माईणकर यांनी 'महाराजाची छोटी मूर्ती तयार करून ती 'एअर इंडिया' कडे पाठवली. विनयाने कमरेत वाकून उजव्या हाताने 'या' असे खुणवीत स्वागत करणाऱ्या भारतीय राजे, महाराजांच्या पेहरावातील 'महाराजा'चे हे अभिजात शिल्प एअर इंडियाच्या पसंतीस उतरले.

'एअर इंडिया' गेल्या अनेक वर्षापासून 'बोधचिन्ह' म्हणून वापरत असलेल्या 'महाराजा'चे शिल्प पनवेल या ऐतिहासिक नगरीत घडले त्याचे शिल्पकार जगन्नाथ माईणकर पनवेल शहरातील महात्मा जोतिबा फुले मार्गावरील जोगळेकर यांच्या एकमजली इमारतीत रहात होते. या इमारतीच्या तळमजल्यावर त्यांचा मातीच्या बाहुल्या, लाकडी खेळणी व विविध मुर्त्या बनविण्याचा छोटासा कारखाना होता. जगन्नाथ माईणकर नोकरी, उद्योग करण्यासाठी कोकणातील राजापूर तालुक्यातील तिघवली या छोट्याशा गावावरून पनवेलला आले होते. जगन्नाथ माईणकरांनी तयार केलेले 'महाराजा' चे शिल्प 'एअर इंडिया' ने बोधचिन्ह म्हणून वापरायचे ठरविल्यावर या शिल्पाचे सर्वाधिकार माईणकरांकडून रू. ५०,०००/- (पन्नास हजार मात्र) ला विकत घेतले. त्या नंतर जगन्नाथ माईणकरांचा महाराजा 'एअर इंडिया' चे बोधचिन्ह होवून साऱ्या जगभरात दिमाखात फिरू लागला.

अलिकडेच ६९ वर्षांनंतर भारत सरकारकडून 'एअर इंडिया' कंपनी पुन्हा टाटा उद्योग समुहात हस्तांतरीत करण्यात आली. त्यावेळी एअर इंडियाची मालकी टाटा उद्योग समुहाकडे गेल्याने एअर इंडियाची आणखी वेगाने प्रगती होईल अशी खात्री नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांनी व्यक्त केली आहे.

जोगळेकरांच्या याच एक मजली इमारतीत एअर इंडियाच्या महाराजाचे शिल्प जन्माला आले.

एअर इंडिया कंपनी आकाशात यशाच्या भराऱ्या मारीत असतांना कालांतराने जगन्नाथ माईणकरांची आर्थिक परिस्थिती हालाखीची झाली. बाजारात टिकावू, चमकणारी प्लास्टीकची खेळणी आली. त्यामुळे मातीच्या, लाकडी खेळण्यांच्या खपावर परिणाम झाला. माईणकरांचा खेळणी बनविण्याचा कारखाना बंद पडला. माईणकर कर्जबाजारी झाले. हाताला काम नाही. जवळ पैसा नाही अशा बिकट परिस्थितीत त्यांचा पनवेलमधील सेंट फ्रान्सिस चर्चमधील काही ख्रिस्ती व्यक्तिंशी परिचय झाला. हालाखीच्या परिस्थितीला कंटाळलेल्या जगन्नाथ माईणकरांनी ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला. ख्रिस्ती झाल्यावर ते पनवेल सोडून अहमदनगरला कायमचे रहायला गेले. तिथेच 'एअर इंडिया' च्या महाराजाची अजरामर शिल्पकृती बनविणाऱ्या या शिल्पकाराचा मृत्यू झाला. त्यांच्यापश्चात दोन मुले व एक मुलगी असे त्यांचे कुटुंब सध्या औरंगाबाद येथे रहात आहेत. **





---

# लालबहादुर शास्त्री यांचा साधेपणा

जगन घाणेकर



सध्या राज्यातील अनेक प्रमुख जिल्ह्यांमध्ये महापालिका निवडणुकांची धूम आहे. निवडणुकीत उभे राहिलेले सर्वच उमेदवार जिंकून येण्याच्या आशेने कार्यकर्त्यांवर, प्रचाराच्या साधनांवर, सामाजिक माध्यमांवर पाण्यासारखा पैसा खर्च करत आहेत. हे पाहिल्यावर त्यांची ही तळमळ नक्की लोकसेवेसाठी आहे की निवडून आल्यावर सत्तेचा मलिदा लाटण्यासाठी, असा प्रश्न कोणालाही पडावा. देशाच्या स्वातंत्र्यानंतर निवडणूक प्रक्रिया, उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी आवश्यक पात्रता, प्रचाराच्या पद्धती, निवडून येण्यासाठी खेळले जाणारे डावपेच यांमध्ये आमूलाग्र बदल होत गेले. यंदाच्या निवडणुकीत काही गोष्टी नव्याने घडल्या. विरोधात उभे राहिलेल्या काही उमेदवारांना कोट्यवधी रुपये देऊन खरेदी केले गेले, तर काहींना धमकावून उमेदवारी मागे घेण्याचे प्रकार घडले. बिनविरोध निवडणुकीचे नवे फॅड यंदा पाहायला मिळाले. आजच्या घडीला निवडणूक म्हटली की सर्व पैशांचा खेळ झाला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुरुवातीला आपल्याला जे राज्यकर्ते लाभले ते मात्र स्वार्थी नव्हते. ना त्यांना पदाचा लोभ होता ना सत्तेची हाव! त्यांच्या प्रामाणिकपणाची आणि साधेपणाची उदाहरणे आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांनी अभ्यासण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. या देशप्रेमी राजकीय नेत्यांपैकी एक असलेले लालबहादुर शास्त्री यांचा ११ जानेवारी हा स्मृतिदिन. लालबहादुर शास्त्री म्हणजे साधेपणा आणि महानतेची प्रतिकृती होते. त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग प्रेरणादायी आहेत. ते देशाचे पंतप्रधान असतानाची गोष्ट आहे. एके दिवशी ते कापड गिरणी पाहण्यासाठी गेले. त्यांच्याबरोबर गिरणीचा मालक, उच्च अधिकारी व इतर महत्त्वाचे लोक होते. गिरणी पाहिल्यानंतर शास्त्रीजी गिरणीच्या गोदामात गेल्यानंतर त्यांनी साड्या दाखवायला सांगितले. गिरणी मालक आणि अधिकाऱ्याने एकापेक्षा एक सुंदर साड्या त्यांना दाखवल्या. शास्त्रीजी साड्या पाहून म्हणाले, 'साड्या तर खूप सुंदर आहेत, यांची किंमत काय आहे?' 'ही साडी ८०० रूपयांची आहे आणि हिची किंमत एक हजार रुपये आहे,' गिरणी मालकाने सांगितले. ही तर खूप महाग आहे, मला कमी किमतीच्या साड्या दाखवा, शास्त्रीजी म्हणाले. ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट होती की ही घटना १९६५ ची होती, यावेळी एक हजार रुपयांची किंमत खूप होती. 'बरं, ही पाहा. ही साडी पाचशे रुपयांची आहे आणि ही चारशे रुपयांची,' गिरणी मालक दुसऱ्या साड्या दाखवत म्हणाला. 'अरे बाबा, यादेखील खूप महाग आहेत. माझ्यासारख्या गरीबासाठी कमी किमतीच्या साड्या दाखवा, ज्या मी खरेदी करू शकेल,' शास्त्रीजी म्हणाले. 'वा सरकार, आपण तर आमचे पंतप्रधान आहात, तुम्हाला गरीब कसे म्हणता येईल? आम्ही तर या साड्या तुम्हाला भेट देत आहोत,' गिरणी मालक बोलला. 'नाही बाबा, मी भेट घेऊ शकत नाही', शास्त्रीजी म्हणाले. यावर तो गिरणी मालक अधिकाराने म्हणाला की, 'आम्ही आमच्या पंतप्रधानांना भेट देणे, हा आमचा अधिकार आहे.' 'हो, मी पंतप्रधान आहे,' शास्त्रीजी शांतपणे म्हणाले.' परंतु, याचा अर्थ असा नाही की ज्या वस्तू मी खरेदी करू शकत नाही त्या वस्तू मी भेट म्हणून स्वीकारू आणि आपल्या पत्नीला देऊ. मी पंतप्रधान असलो तरी आहे गरीबच ना ! तुम्ही मला स्वस्त साड्याच दाखवा. मी ऐपतीप्रमाणेच साडी खरेदी करेन.' गिरणी मालकाच्या साऱ्या विनवण्या व्यर्थ गेल्या. देशाच्या पंतप्रधानांनी स्वस्त भावाच्या साड्याच खरेदी केल्या. शास्त्रीजी एवढे महान होते की मोह त्यांना स्पर्शही करू शकत नव्हता. शास्त्रीजी गृहमंत्री असताना तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना काश्मीर येथील बैठकीस जाण्यास सांगितले त्यावर त्यांनी त्यांच्याकडे थंड प्रदेशात घालायचे गरम कपडे नसल्याने जाण्यास अनिच्छा दर्शवली, त्यानंतर नेहरू यांनी स्वतःचा कोट शास्त्रीजींनी देऊ केला. पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतरही शास्त्रीजींकडे त्यांच्या मालकीची चारचाकी गाडी नव्हती. या पदावर असतानाच त्यांनी गाडी खरेदी करण्यासाठी कर्ज काढले. या कर्जाचे हप्ते त्यांनी पंतप्रधान काळात आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीने फेडले. याउलट आजच्या स्थितीचा विचार केल्यास साध्या महापालिकेच्या निवडणुकीत विजयी होऊन नगरसेवक बनलेल्याकडे पाच वर्षांत गाडी बंगल्यासह अनेक सुखसुविधा पायाशी लोळण घेऊ लागतात. पुढच्या किमान दोन पिढ्या बसून खातील एव्हढा बक्कळ पैसा तिजोरीत जमा होतो. हा भेद नेमके काय दर्शवतो ? आजमितीला पक्षातून अधिकृत तिकीट मिळण्यासाठी उमेदवाराला पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी आर्थिक हितसंबंध जोपासावे लागतात. तिकीट मिळाल्यावर प्रचारासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात त्यामुळे निवडून आल्यानंतर खर्च केलेला पैसा वसूल करण्यात आणि भविष्यासाठी आपली आणि कुटुंबियांची व्यवस्था करण्यात काही वर्षे निघून जातात.

एकूणच ज्याच्याकडे बक्कळ पैसा आहे असाच उमेदवार निवडणूक लढवू शकतो आणि जिंकून येऊ शकतो हे समीकरण निश्चित झाले आहे. त्यामुळे शास्त्रीजींसारखे साधे आणि प्रामाणिक लोकनेते येणाऱ्या पिढीला केवळ इतिहासातच वाचायला मिळतील हे निश्चित! **

# खरा कोविड योद्धा..मा. राजेशजी(भैय्या)टोपे..!!

शिवाजी चौगुले

एरवी स्थानिक राजकीय टिकेला कधीच प्रति उत्तर न देण्याचा आदरणीय राजेश (भैय्या) टोपे साहेब यांचा स्वभाव परंतु मागील काळात कोरोना सारख्या गंभीर शत्रु सोबत राजेश भैय्यांनां लढताना आणि भिडताना पाहिलंय. खरंच भैय्यासाहेब तुमचा हा लढवय्या बाणा पाहुन आमचा उर भरून येतो....!!

मतदारसंघात, तालुक्यात, किंवा जिल्ह्यात कुठलाही कार्यक्रम असला की चौकटीत फक्त महत्त्वाच्या मुद्यांना स्पर्श करत भाषण करत असे. आमच्या सारख्या अनेक युवा कार्यकर्त्यांनांही वाटायचं की खरंच भैय्यासाहेब खुपच साधे आहेत. सतरा वर्षे मंत्री राहिलेले भैय्यासाहेब यांनी कधीच अंगावर कोट नाही चढवला की कधी झग्याचा ड्रेस घातला नाही, गाडीतुन उतरले की साहेब भराभर चालत कधी पळत सुटतात, आम्ही अजुन तरी भैय्यासाहेबांनी हाताची घडी घालुन ऐटबाज चालीत चालताना साहेबानां कधी पाहील नाही. आम्हाला ही वाटायच की इतर नेत्यासारंख भैय्यासाहेबांनी ही गाड्याचां ताफा घेत कोल्हापुरी घालत धुराळा उडवत यावं. अधिकार्यानां मंत्रीपदाची पॉवर दाखवत शिवराळ भाषेत बोलाव परंतु हा विचार भैय्यासाहेबांच्या मनाला कधीच शिवला नाही, साध्यातला साधा ही अधिकारी/कर्मचारी असला की त्याला साहेब म्हणत मी राजेश टोपे बोलतोय असे सांगत मन जिंकून घेत असत.

सतत लोकांत राहुन स्व.अंकुशरावजी टोपे साहेब यांच्या पावलावर पाऊल ठेवत अहोरात्र जनतेच्या कल्याणासाठी, सेवेसाठी विकासकामे करूनही ही २०१९ च्या विधानसभा निवडणुकित निसटता विजय भैय्यासाहेबानां मिळाला पण विजय हा सत्याचाच झाला पक्ष, जात - पात, धर्म, समाज, श्रीमंत गरीब, असा भेद भाव न करता, उदा. गळ्यात कुणी विरोधी पक्षाचा रुमाल घालुन ही कधी आला तर त्यानीं कधी कुणाच काम अडवलं नाही. परीणामी भैय्यासाहेबांचा गोड स्वभावाचा फायदा घेत पक्षातील काही गद्दारांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भैय्या साहेबांच्या विरोधात काम केले. तरीही भैय्या साहेबांनी धनदांडग्या उमेदवाराला धुळ चारत निवडुन येऊन सलग पाचव्यांदा आमदार झाले. पक्ष नेतृत्वाने विरोधी पक्षात बसण्याची भुमिका घेतली. नंतर सत्तेचे फासे पलटले ज्या शिवसेना पक्षाच्या नावावर विरोधकानीं भैय्यासाहेबानां आव्हान दिले होते त्याच शिवसेना पक्षप्रमुखांच्या नेतृत्वात भैय्यासाहेब कॅबिनेट मंत्री झाले. खातं मिळाल आरोग्य दोन वर्षापासुन महाभयानक कोरोना साथ रोग आला होता.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भैय्यासाहेबांच्या गोड स्वभावाचा फायदा घेत पक्षातील काही गद्दारांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकी प्रमाणेच भैय्या साहेबांच्या विरोधात काम करून जातीवाद करत धनदांडग्या उमेदवारांनी मतदार संघात अमाप पैशाच्या जोरावर मतदारांना प्रभावित करून व भैय्यासाहेब यांच्या तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा सोबत पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हांवर मुद्दाम हुन उमेदवार उभा केला त्यामुळे मतदारांना मध्ये गोंधळ निर्माण होऊन पिपाणी ने भैय्यासाहेबांची बरीचशी मते खाल्ली व भैय्यासाहेबांचा किरकोळ मतांनी निसटता पराभव झाला.

भैय्या साहेबाच्या पराभवाकरीता सर्व विरोधकांनी स्वाभिमान, पक्ष, नितीमत्ता, फोडाफोडी, जातीयवाद, हेवेदावे, नाती - गोती, अमाप पैसा, दबावतंत्र, दादागिरी करून सर्वजण म्हणजेच होशे, नवशे, गवशे एकत्र येऊन यांनी खुप मोठमोठी षडयंत्र केली, पण तरीही व एकटे भैय्यासाहेब त्या सर्व विरोधकांना पुरून उरले. व शेवटपर्यंत तगडी फाईट देत विरोधकांना घाम फोडला. आजही भैय्यासाहेबांचा तोच जोश, तोच दरारा, तोच जनतेप्रती नम्रपणा पहायला मिळतो. अशा या खऱ्या कोविड युद्धाचा आरोग्य मंत्री असताना शिपाई होण्याचे भाग्य मला लाभलं..!! साहेब वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा..!!

## नितांत प्रेरक...

# रिचर्ड फाईनमन




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

रिचर्ड फाईनमन, हे अच्युत गोडबोले आणि दीपा देशमुख लिखित पुस्तक पुण्याच्या मनोविकास प्रकाशनने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाद्वारे लेखकद्वयांनी, मराठी वाचकांना विसाव्या शतकातील एका महान शास्त्रज्ञाच्या जीवनकार्याची उत्तम ओळख करून दिली आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि आतील मांडणी गिरीश सहस्रबुद्धे यांची आहे. पृष्ठ सहावरील रिचर्ड फाईनमन यांचे अर्कचित्र रोहन पोरे यांनी रेखाटले आहे.

रिचर्ड फाईनमन (१९१८-१९८८) हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व होते. जीवनावर प्रचंड प्रेम करणारा, मिश्किल स्वभावाचा, नवनवीन गोष्टी कुतूहलाने शिकणारा, चित्रकलेची आवड असणारा, संगीतावर जीव टाकणारा, ड्रम वाजवणारा, इतिहासाचा पाठपुरावा करणारा, भाषेचं सौंदर्य न्याहाळणारा, तल्लख बुद्धीचा, गणित आणि भौतिकशास्त्र या विषयांची नुसती गोडी नव्हे, तर त्यात सखोल ज्ञान आणि प्रावीण्य असणारा, संशोधक वृत्तीचा, शिकवण्याची आवड असणारा, तत्त्वज्ञानाची आवड जपणारा, माणसाच्या जगण्यावर गंभीरपणे विचार करणारा, पण सतत आनंदी असणारा आणि सगळ्यात महत्त्वाचा म्हणजे जसा आहे तसा असणारा, असा भौतिकशास्त्रज्ञ ज्याने क्वांटम मेकॅनिक्स, इलेक्ट्रो डायनॅमिक्स थिअरी आणि भौतिकशास्त्र या विषयांत सखोल काम केले होते, अशी व्यक्ती म्हणजेच रिचर्ड फाईनमन. जागतिक पातळीवर आईन्स्टाईननंतर ज्या शास्त्रज्ञांना प्रचंड प्रसिद्धीचे वलय लाभले, त्याम ध्ये दुसरा क्रमांक रिचर्ड फाईनमनला दिला जातो. नोबेल पुरस्कारप्राप्त रिचर्ड फाईनमन हा विसाव्या शतकातला एक प्रचंड बुद्धिमान आणि मानवतावादी शास्त्रज्ञ होता. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेमध्ये अनेक स्थलांतरित लोकांनी प्रवेश केला. त्यामध्ये ज्यू लोक खूप होते. युरोपमध्ये ज्यू धर्माच्या विरोधात वातावरण तापले होते. जर्मनी इटली आणि पूर्व युरोप या देशांत होणाऱ्या दंगलीत ज्यूंना लक्ष्य केले जात होते. १८९५ साली न्यूयॉर्क बंदरात उतरून स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा उभारलेल्या ठिकाणी पाच वर्षांचा छोटासा मुलगा, आपल्या आईवडिलांबरोबर, रशियाच्या मिन्स्क भागातून अमेरिकेत दाखल झाला. त्याचे नाव होते मेलविल फाईनमन. या तरुणाला विज्ञानाची खूपच आवड होती. मात्र खर्चिक शिक्षण परवडणारे नसल्याने, त्याने पोटापाण्यासाठी अनेक व्यवसाय केले. पुढे त्याची ल्युसिल फिलिप्स या तरुणीशी ओळख झाली. मेलविलच्या गरिबीमुळे तिच्या घरचा विरोध असूनही त्यांनी १९१७ साली लग्न केले. तिनेही नोकरी करून घर संसाराला हातभार लावला. १९१८ साली अमेरिकेतल्या न्यूयॉर्क शहरातल्या मॅनहटन भागात राहणाऱ्या, या कुटुंबात रिचर्डचा जन्म झाला. रिचर्ड तथा रिटीला विज्ञानाची आवड बालवयातच लागावी म्हणून मेलविनने अनेक प्रयत्न केले. त्यामुळे रिचर्डला विज्ञानाची आवड लागली. गरिबीतही हे कुटुंब सुखी, सम ाधानी होते.

न्यूयॉर्क शहरात स्थलांतरित मुलांना सरकारी शाळेत मोफत शिकवले जाई. शाळेतही फाईनमन खूपच हुशार विद्यार्थी म्हणून शिक्षकांना माहीत होता. गणित हा त्याच्या आवडीचा विषय. उदाहरण दिले की सर्वात आधी त्याचे उत्तर तयार असे. शाळेत असताना फाईनमनला दंगामस्ती, मारामारी आणि खेळ या गोष्टी आवडत नसत. आंतरशालेय गणित स्पर्धांमध्ये भाग घेऊन शाळेला पहिला क्रम ांक मिळवून देणे, हे काम त्याला अतिशय आवडत असे. विविध प्रकारची गणिते तोंडी सोडवण्याचे त्याचे कौशल्य पाहून त्याचे मित्र, शिक्षक, शेजारी, नातेवाईक त्याला 'मॅड जीनियस' म्हणत असत. एकदा त्याला त्याच्या नातेवाईकांच्या हॉटेलमधील रेडिओ दुरुस्त करण्याची संधी मिळाली. ते त्याने यशस्वीपणे पूर्ण केले आणि यामुळे तो रेडिओ दुरुस्त करणारा छोटा मेकॅनिक ठरला. आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी तोही काम करून पैसे मिळवू लागला होता. फाईनमनाला विज्ञान आणि गणित विषयांत उत्तम गुण मिळूनही अनेक विद्यापीठांत तो ज्यू असल्याने त्याला प्रवेश मिळाला नाही. इतर ठिकाणी फी जास्त असल्याने ती भरण्याची क्षमता त्याच्या कुटुंबीयांमध्ये नव्हती. शेवटी अथक प्रयत्नानंतर एमआयटी या नामवंत, जगप्रसिद्ध संस्थेत त्याला प्रवेश मिळाला. तेथे शिकत असताना त्याला जाणवले की गणित विषयाच्याही काही मर्यादा आहेत. शेवटी तो भौतिकशास्त्राकडे वळला. येथेच फाईनमनला विविध ज्ञानशाखांची माहिती मिळाली. तारुण्यात पदार्पण करणाऱ्या रिचर्डला त्याची शाळेतील जिवलग मैत्रीण आर्लिन ग्रीनबाम अतिशय आवडत असे आणि लग्नाविषयी तिला वारंवार विचारून, अखेर त्याने तिच्याकडून विवाहासाठी होकारही मिळवला. आई वडिलांच्या संमतीने त्यांचा साखरपुडाही झाला होता. नंतर आर्लिनला क्षय झाला. १६ जून १९४५ रोजी हॉस्पिटलमध्ये तिचा मृत्यू झाला. त्यापूर्वी हट्टाने रिचर्डने तिच्याशी विवाह केला होता. आठवड्यातून एकदा प्रत्यक्ष भेटल्यानंतर तो नंतर तिला दीर्घपत्रे लिहीत असे. १९२० ते १९४० या काळात भौतिकशास्त्राचा झपाट्याने विकास होत होता. अणुविज्ञानातले संशोधन केंद्रभागी आले होते. जगभरातले बुद्धिमान तरुण या शाखेकडे आकर्षिले जात होते. अणू, त्याचे अंतरंग आणि अणुचे चित्रच विश्वाचे चित्र उलगडून दाखवू शकेल असे संशोधकांना वाटत होते. या संशोधनांना तंत्रज्ञानाचीही जोड मिळत चालली होती.१९४१ नंतर युरोपमध्ये युद्धाचे वातावरण पुन्हा जोर धरू लागले होते. हिटलरने जर अणुबॉम्ब बनवला तर जगभर हाहाकार माजेल, हे टाळण्यासाठी अमेरिकेने अणुबॉम्ब बनवण्याचे ठरवले. ओपेनहायमर या संशोधकाच्या नेतृत्वाखाली मॅनहॅटन प्रोजेक्टसाठी सगळे तयारीला लागले. ओपेनहायमर तथा 'ओपी 'ने फाईनम नला या प्रोजेक्टमध्ये मुद्दामहून बोलावून घेतले. या प्रोजेक्टबद्दल अत्यंत गुप्तता ठेवण्यात आली होती. या ठिकाणचे विविध अनुभव या पुस्तकात नमूद केले आहेत. फाईनमनला या संपूर्ण प्रोजेक्टची माहिती होती. १६ जुलै १९४५ या दिवशी भल्या पहाटे, न्यू मेक्सिकोच्या वाळवंटी भागात, अणुबॉम्बचा स्फोट करण्यात आला. हे पाहण्याची संधी फाईलमनला प्राप्त झाली. त्यानंतर जपानम धल्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकण्यात आला. परिणामी प्रचंड प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली. दोन्ही शहरे बेचिराख झाली. फाईनमनला दीर्घकाळ नैराश्य आले. त्यानंतर त्याने कॉर्नेल विद्यापीठात काम करायला सुरुवात केली. परंतु तो तेथे फार काळ रमला नाही. नंतर त्याने कॅल्टेक विद्यापीठात अणुविज्ञान शाखेत काम करायचे ठरविले. तेथे शिकविताना त्याला ब्राझीलमध्ये शिकवण्याची आणि जपानमध्ये एका बैठकीसाठी जाण्याची संधी मि ळाली. जपानला जाताना, जपानी भाषाही शिकून घेतली होती. जपानमध्ये त्याने हट्टाने, काही गैरसोयी स्वीकारून, जपानी हॉटेलमध्ये राहण्याला प्राधान्य दिले. ब्राझीलच्या वास्तव्यात फाईनमनने मेरी लो या आपल्या मैत्रिणीला लग्नाची मागणी घातली आणि १९५२च्या जून महिन्यात तिच्याशी लग्न केले. मात्र हे लग्न यशस्वी झाले नाही चार वर्षांनी त्यांनी घटस्फोट घेतला. एका बाजूला फाईनमनचे संशोधन सुरूच होते.

१९५४ साली फाईनम नला वैज्ञानिक क्षेत्रातला पहिला मानाचा 'अल्बर्ट आईन्स्टाईन पुरस्कार' मिळाला. फाईनमनने गेलमानबरोबरच्या संशोधनातून अनेक पेपर प्रकाशित केले आणि क्वांटम फिजिक्समध्ये मोलाची भर घातली. त्यांची मैत्री शेवटपर्यंत टिकून राहिली. त्यांनी एकमेकांच्या शेजारीच घरे घेतली होती.ऐन प्रसिद्धीच्या शिखरावर असताना फाईनमनने २४ वर्षांच्या ग्वेनेथशी, २० सप्टेंबर १९६०रोजी विवाह केला. त्यानंतर त्यांना कार्ल नावाचा मुलगा झाला आणि मिशेल नावाची मुलगी त्यांनी दत्तक घेतली. त्यांचा सुखी संसार सुरू झाला. शाळकरी मुलांची नीरस पाठ्यपुस्तके सुधारण्याची जबाबदारी फाईनमनने उत्तम प्रकारे पार पाडली. सोप्या भाषेत स्वतंत्र विचार कसा करता येईल आणि मुलांना विज्ञानाच्या मूलभूत संकल्पना सोप्या भाषेत कशा शिकवता येतील याचा विचार करून त्याने अनेक पाठ्यपुस्तके लिहिली. फाईनमनने इलेक्ट्रॉनच्या चार्जविषयीच्या पूर्वीच्याच प्रश्नामध्ये लक्ष घातले होते. विद्युत चुंबकत्व, अणुविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, विद्युत चुंबकीय उत्सर्जन अशा विविध वैज्ञानिक शाखांशी या संशोधनाचा संबंध जोडला होता. याच प्रश्नावर श्रॉडिंजर, डायसन आणि टोमोनागा हेही काम करत होते. १९६५साली फाईनमन, श्रॉडिंजर आणि जपानी शास्त्रज्ञ टोमोनागा यांना क्वांटम इलेक्ट्रोडायनॅमिक्स या विषयातल्या समस्यांना स्वतंत्रपणे हाताळून तीन वेगळ्या पद्धतीने उपाय शोधल्याबद्दल नोबेल पुरस्कार देण्यात आला. फाईनमनने नोबेल पुरस्कार स्वीकारताना, विनोदी ढंगाने केलेले भाषण गाजले होते. नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतर ज्यू धर्मीयांसाठी निघणाऱ्या एका पुस्तकात फाईनमनच्या नावाचा समावेश करण्यासाठी त्याची परवानगी मागितली गेली. त्याने स्पष्ट नकार कळवला. त्याने कळवले की, ''विज्ञानावर प्रचंड प्रेम करणारा मी एक माणूस असून विज्ञान कुठलाच धर्म मानत नसल्याने मीही तसाच आहे.'' केवळ ज्यू आहे म्हणून फाईनमन गुणवान आहे, असं म्हणणं कसं अयोग्य आहे, हे त्याने सविस्तरपणे पत्राद्वारे कळविले. १९७८ साली फाईनमनच्या कॅन्सरचे निदान झाले. जास्तीत जास्त पाच वर्षाचे आयुष्य असल्याचे डॉक्टरने सांगितले. परंतु फाईनम नने शिकवणे सुरूच ठेवले होते. त्याने लिहिलेल्या आपल्या पुस्तकात, केलेल्या चुका, आयुष्यात आलेल्या अनेक स्त्रिया, चांगले-वाईट अनुभव, दुखावले गेलेले लोक, गमतीजमती, आयुष्यातल्या रितीभाती, शिष्टाचार यामुळे उडालेली धांदल, छंद असं सगळं लिहिले होते.

१५ फेब्रुवारी १९८८ या दिवशी वयाच्या ६९व्या वर्षी रिचर्ड फाईनमन या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञाने या जगाचा कायमचा निरोप घेतला. 'निसर्ग अगदी साधी आणि सोपी तत्त्वं वापरून आपलं काम अव्याहतपणे करत असतो' यावर विश्वास असणाऱ्या एका बुद्धिमान, हसऱ्या आणि विनोदी शास्त्रज्ञाला जग कायमचे मुकले. फाईनमनबद्दल आदर दर्शविण्यासाठी, जगातील विविध देशांनी, विविध माध्यमांद्वारे, त्याच्याविषयी साऱ्याचे लक्ष वेधले होते.जीनियस रिचर्ड फाईनम नची ही जीवनकहाणी सर्व लहानथोरांना विलक्षण प्रेरक वाटणारी अशीच आहे. शेवटी संदर्भसूची दिली आहे.अच्युत गोडबोले, दीपा देशमुख यांचा सचित्र परिचय करून दिला आहे. फाईनमन यांच्या जीवनाची ओळख, विविध कृष्णधवल छायाचित्रांनी होते आहे. **

पुस्तकाचे नाव : रिचर्ड फाईनमन
लेखक : अच्युत गोडबोले, दीपा देशमुख
प्रकाशक : मनोविकास प्रकाशन
६७२, नारायण पेठ, पुणे-३०
पहिली आवृत्ती : ७.११.२०१५
पृष्ठे : ६८, मूल्य : रु. ७०/-

# आज खरंच महिला सुधारत आहेत काय?

आजच्या महिला सक्षम आहेत व महिलाराज आलेला आहे. असं दिसतंय. परंतु हा महिलाराज अतिरिक्त सुखाचा उपभोक्ता ठरु लागलेला आहे. कारण आजच्या महिला या कुणाला कधीच कोणत्याही पद्धतीची मदत करतांना दिसत नाहीत. उलट आजच्या काळातील महिला या महिलांचाच कर्दनकाळ ठरु लागलेल्या आहेत.



अंकुश शिंगाडे

अलिकडील काळात महिला सुधारली असे म्हटले जाते. महिलांची अंधश्रद्धाचे बुरखे तोडून जागतिक दर्जाही प्राप्त केला असे म्हटले जाते. तशीच ती अंतराळात गेली, आय पी एस बनली, राष्ट्रपती बनली, पंतप्रधान बनली. असंही म्हटलं जातं. त्यातच आजच्या काळात बऱ्याच महिलांनी डोक्यावरील पल्लू फेकला. त्यातच त्या सलवार कमीज नाही तर जीन्स आणि टी शर्ट वर वावरायला लागल्या असंही चित्र दिसतं. त्या आता बुरसटलेल्या विचारांच्या लोकांच्या गोष्टी ऐकतांना दिसत नाहीत. दिसतात, पाश्चिमात्य विचारांचा अंगीकार करत असलेल्या. त्या पद्धतीनं वागणाऱ्या. परंतु हे जरी बरोबर असलं तरी काही महिला या आजही अंधश्रद्धेत वावरतांना दिसतात. हेच अनुभवायला मिळतं कधीकधी. तेव्हा विचार येतो की आज खरंच महिलाराज आहे की महिलाराज नाही.

एक कार्यक्रम. त्या कार्यक्रमात एके ठिकाणी शिवमहापुराण होतं. लोकांनी तो कार्यक्रम आयोजीत केला होता व त्या कार्यक्रमात ज्या आचार्याला बोलावलं होतं. त्या आचार्याच्या स्वागतासाठी खाली साड्या अंथरल्या होत्या. तो आचार्य त्या साड्यांवरुन चालला. त्यानंतर त्या आचार्याची महिलांनी पुजा आणि आरतीही केली. त्यातच आरतीपुर्वी त्या आचार्याचे पाय धुतले व ते पाणी महिलांनी प्राशनही केले.

महाराज... महाराज म्हणून ज्या लोकांचा गौरव होतो. आजच्या महिला त्या महाराजांची निरतिशय सेवा करतांना चित्र दिसतं आणि करायलाही हवं. तशी सेवा घरात आपल्या सासूसासऱ्याची करतांना दिसत नाहीत. जी सासूसासऱ्याची सेवा केल्यानं पुण्य लागू शकतं. परंतु अलिकडील काळात महिला तशा वागत नाहीत. त्या दारु, गांजा पिणाऱ्या लोकांची महाराज म्हणून पुजा करतात. सेवा करतात. यालाच महिलाराज म्हणतात व तो आज आलेला आहे. आज महिलाराज आलेला आहे की पुरुषराज आलेला आहे हे कळायला मार्ग नाही. काळ बदलला आहे. आपण पाश्चिमात्य विचारसरणी अंगीकारली आहे. मात्र हा बदलाव काही ठिकाणी दिसतोय तर काही ठिकाणी हा बदलाव अजिबात दिसत नाही. काही ठिकाणी या बदलावाचा परिणाम दिसतोय तर काही ठिकाणी याचा परिणाम अजिबात दिसत नाही. अलिकडील काळात आलेला महिलाराज, हा महिलांना सक्षम बनविण्यासाठी आहे. खरंच महिला सक्षम नाहीत काय? आजच्या काळातील महिलाही सक्षम आहेत. आज बऱ्याच घरात महिला या पुरुषांना आपल्या बोटावर नाचवतात आणि पुरुष नाचतातही महिलांच्या बोटावर. जर एखादा पुरुष महिलांच्या बोटावर नाचायला तयार नसल्यास त्या पुरुषांचा संसारच उद्ध्वस्त होत असतो नव्हे तर होवून बसतो.

आजच्या महिला सक्षम आहेत व महिलाराज आलेला आहे. असं दिसतंय. परंतु हा महिलाराज अतिरिक्त सुखाचा उपभोक्ता ठरु लागलेला आहे. कारण आजच्या महिला या कुणाला कधीच कोणत्याही पद्धतीची मदत करतांना दिसत नाहीत. उलट आजच्या काळातील महिला या महिलांचाच कर्दनकाळ ठरु लागलेल्या आहेत.

ज्योतीषशास्त्रानुसार म्हटलं जातं जगात नऊ ग्रह आहेत. जे नऊ ग्रह आपल्याला छळत असतात. ज्यात सुर्य, शनी, मंगळ, बुध, शुक्र, राहू, केतू, गुरु, चंद्र यांचा समावेश होतो. यात सुर्य हा तारा असला तरी त्याला सर्वात मोठ्या ग्रहाचा मान दिला जातो. कारण तो इतर सर्व ग्रहाचं संचारण करतो. अर्थात इतर ग्रहांना त्याचा प्रकाश प्राप्त होत असतो. म्हणतात की सुर्य हा ग्रह वडीलांचं संचालन करतो व चंद्र हा ग्रह आईचं तर शुक्र हा ग्रह पत्नीचं संचालन करतो. जर सुर्य आणि चंद्र हे आपले ग्रह प्रबळ असतील तर सर्वच बरोबर होतं. याचाच अर्थ असा की जे व्यक्ती आपल्या आईवडीलांची सेवा करतात. त्या व्यक्तींवर इतर सर्व ग्रहांची कृपा होते. शिवाय असंही म्हटलं जातं की गणेश भगवानाने पृथ्वीप्रदक्षिणा न करता आपल्या आईवडीलांची प्रदक्षिणा केली. ज्यातून त्याची पृथ्वीप्रदक्षिणा यशस्वी झाली. आजचे लोकं हे तत्व पाहात नाहीत. ते घरच्या म्हाताऱ्या असलेल्या आईवडीलांची सेवा करीत नाहीत. ज्यातून पितृदोष व मातृदोष लागतो. ते पत्नीच्याच मनानं ऐकतात. ज्यातून सुर्य व चंद्रमा वाईट होतो. त्यासोबतच इतरही ग्रह. याचाच अर्थ आपण आपल्या घरी आपल्या आईवडीलांची सेवा करावी. ज्यांनी आपल्याला इतर ग्रहांची ओळख करुन दिली.

आजच्या काळात महिलाराज आहे व त्याच महिलाराजानं आपल्या जीवनातील सुर्य व चंद्र खराब करुन टाकलेला आहे. त्या महिलाराजाला आपल्या घरातील सुर्य व चंद्रमा अजिबात चालत नाही. ज्यातून पितृदोष लागतो व तेवढाच मातृदोषही लागतोय. आजची महिला घरातील आपल्या पतीच्या आईवडीलांना छळत असते आणि बाहेरील लोकांची सेवा करीत असते. याचा प्रत्यय बऱ्याच ठिकाणी शिवमहापुराण किंवा सुंदरकाड वा इतरही होणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रम ातून येतो. घरी आपल्या म्हाताऱ्या सासूसासऱ्याची सेवा न करणारे उभयंते या ठिकाणी कथा सांगायला येणाऱ्या आचार्याच्या पायाला धूळ लागायला नको म्हणून आपल्या अंगात वापरायच्या साड्या खाली अंथरतात आणि त्याला याच आचार्याच्या पायाची व त्याच्या इतर साथीदाराच्या पायाची धूळ लागूनही त्या साड्या न धुता त्या तशाच वापरतात. कारण तशा स्वरुपाच्या त्या साड्या पायाच्या धुळीनं घाणेरड्या जरी झाल्या असल्या तरी त्या साड्यांना प्रसाद समजलं जातं. काही ठिकाणी तर यापेक्षा विचित्र प्रकार आहेत.

या ठिकाणी तर महिला अशा आचार्याचे पाय धुवून पाणी पितात. धुळीनं भरलेल्या पायाचं पाणी. आता खरंच ही विचार करायला लावणारी बाब आहे की नाही. अन् हेच आचार्य रात्रीच्या अंधारात गांजा पितांना दिसतात. आजच्या लोकांना गांजा पिणारे आचार्य चालतात. परंतु आपले सासूसासरे चालत नाहीत. एवढंच नाही तर घरी आपल्या सासूसासऱ्याची सेवा न करणाऱ्या या महिला अशा ठिकाणी आचार्याची एवढी सेवा करतात की वाटतं की काय, बाई आहे की जी खरंच सेवेकरी आहे आणि घरात सेवेच्या नावावर बारागाडे बोंब.

आज ज्योतीष व ग्रहदोषावरुन बोलायचं झाल्यास मातृदोष व पितृदोष लागणे किंवा सर्वच ग्रहांचा दोष दिसणे. या गोष्टी महिलाराजकडे अंगुलीनिर्देश करतात. हा दोष महिलाराज अस्तित्वात आल्याचा आहे की अंधश्रद्धाळू कल्पनांचा आहे? ते कळेनासे झाले. लोकं घरी आपल्या सासूसासऱ्याची सेवा करुन पुण्य न कमवता लोकांची सेवा करण्याकडे लागून पुण्य कमविण्याच्या मार्गाकडे का लागतात? खरंच या पद्धतीनं पुण्य मिळतं का? खरंच दारु, गांजा पिणाऱ्या बुवाच्या मागं लागणं, त्याची पुजा करणं, त्याच्या पायाचं पाणी पिणं आणि त्यानं सांगीतलेल्या थोतांड गोष्टी ऐकून त्या पद्धतीनं वागणं. या गोष्टीवरुन आजचा महिलाराज खरंच सुधारत आहेत की त्याच अंधश्रद्धेच्या बुरख्यात शिरणार आहेत? ती विकासाच्या मर्यादा पार पाडणार आहे की तशीच पितृदोष व मातृदोषाच्या आहारी जाणार आहे? ती सासूसासऱ्याची सेवा करण्याला प्राधान्य देणार आहे की त्यांना त्रास देवून बुवाबाजी करणाऱ्या लोकांची सेवा करण्याकडे जास्त कल देणार आहे? हे सर्व प्रश्न बुचकळ्यात टाकणारे आहेत. खरंच आज चंद्र, सुर्याचा शोध लागलेल्या काळात महिलांनी आचार्याचे पाय धुवून पाणी प्यावे काय? त्याच्या पायाच्या धुळीनं भरलेल्या साड्या वापराव्या काय? अन् त्यानं तरी श्रद्धेनं पुजणाऱ्या महिलांची गांजा पिवून श्रद्धा तोडावी काय? महिलांनी घरी सासूसासऱ्यांची सेवा न करता इतरांचीच सेवा करणाऱ्या गोष्टीवर जास्त लक्ष द्यावे काय?

अन् या सर्व गोष्टी आज घडत असेल तर यालाच महिलाराज म्हणावे काय? या सर्व गोष्टी विचारात घेण्यालायक आहेत. आजचा काळ लक्षात घेवून याचा लोकांनी आज विचार करावा व ठरवावं की आज आपण कसं वागायचं कसं नाही? हा विचार जेव्हा प्रत्येक घरातील महिला करेल व त्यानुसार वागेल. ती अंधश्रद्धेचा बुरखा सोडेल. गांजा पिणाऱ्या साधूची संगत व सेवा सोडून आपल्याच सासूसासऱ्याची सेवा जेव्हा करेल. तेव्हाच खऱ्या अर्थानं म हिलाराज आला असं म्हणता येईल. अन् तेव्हाच प्रत्येक महिलांच्या स्त्रीजन्माचंही सार्थक होईल यात शंका नाही.**

## निवडक

### किशन खारके ठरला राष्ट्रीय नेमबाज

**नवीन पनवेल** : डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंज ६८वी राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा दि.१७ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान संपन्न झाली. या स्पर्धेत सिद्धांत रायफल क्लबचा नेमबाज किशन खारके यांनी ५३५ गुण संपादन करून सेंटर फायर पिस्तूलमध्ये विख्यात



नेमबाज (रिनॉन्ड शूटर) होण्याची पदवी संपादन केली. या स्पर्धेत क्लबचे नेमबाज जयंत साळवे यांनी २५ मीटर सेंटर फायर पिस्तूलमध्ये विख्यात नेमबाज होण्याची पदवी संपादन केली. तसेच, १० मीटर पिस्तूल शूटिंगमध्ये सुप्रिता सुबुद्धी ५५८ गुण संपादन करून भारतीय ट्रायलसाठी निवड झाली. हे सर्व सिद्धांत रायफल क्लबच्या ईंडियन मॉडेल स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज येथे अलंकार कोळी, किशन खारके, जयंत साळवे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक स्वत: व इतर नेमबाज यांच्यासाठी प्रशिक्षणही देत आहेत.

### महाराष्ट्राचे वादळ तेलंगणात धडकणार

**पुणे** : अस्सल मराठी मातीतील खेळ असलेल्या खो-खोचा रणसंग्राम आता तेलंगणाच्या भूमीत पेटणार असून महाराष्ट्राची फौज जेतेपदाचा झेंडा रोवण्यासाठी सज्ज झाली आहे. काजीपेठ-तेलंगणा येथील रेल्वे मैदानावर दि.११ ते १५ जानेवारी दरम्यान होणाऱ्या ५८ व्या पुरुष व महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने आपले दोन्ही संघ जाहीर केले आहेत. हे संघ सहभागापुरते नसून जेतेपदावर दरारा निर्माण करण्याच्या निर्धाराने मैदानात उतरले आहेत. कर्णधार निहार



दुबळे यांच्या नेतृत्वाखाली पुरुष संघात अनुभवाची भक्कम फळी आहे. संघात शुभम थोरात, प्रतिक वाईकर, सुयश गरगटे, रुद्र थोपटे, अनिकेत चेंदवणकर, निहार दुबळे, प्रतिक देवरे, ऋषिकेश मुर्चावडे, विजय शिंदे, सचिन पवार, अक्षय मासाळ, अभिषेक केरीपाळे, शुभम उतेकर, वेदांत देसाई, तुकाराम कारंडे यांचा समावेश आहे. तर, कर्णधार रितिका राठोड यांच्या नेतृत्वाखाली महिला संघात धाराशिवचे वर्चस्व दिसून येते. संघात अश्विनी शिंदे, संध्या सुरवसे, सुहानी धोत्रे, संपदा मोरे, मैथिली पवार, तन्वी भोसले, प्रियांका इंगळे, कोमल दारवटकर, श्वेता नवले, रितिका राठोड (कर्णधार), रेश्मा राठोड, पूजा फरगडे, सरिता दिवा, प्रतिक्षा बिराजदार, पायल पवार या रणरागिणी मैदानात उतरणार आहेत.



### माजगाव केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

**रसायनी** : केंद्रप्रमुख जे.पी. परदेशी यांच्या संकल्पनेतून रसायनी पाताळगंगा परिसरातील माजगाव केंद्रातील राजिप तळवली शाळेत क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन खालापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी दीपा परब यांच्या हस्ते झाले. या केंद्रस्तरीय स्पर्धेत ९ शाळांनी सहभाग घेतला होता. त्यात लहान व मोठा गट असून सांघिक खेळ कबड्डी, लंगडी, आणि वैयक्तिक खेळामध्ये धावणे, लिंबू चमचा, पोते उड्या, दोरीवरच्या उड्या, बेडूक उड्या इत्यादी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या केंद्रस्तरीय स्पर्धेत ९ शाळांनी सहभाग घेतला होता. या क्रीडा स्पर्धेत लहान गट व मोठा गट असून त्यात सांघिक खेळ कबड्डी, लंगडी, आणि वैयक्तिक खेळामध्ये धावणे, लिंबू चमचा, पोते उड्या, दोरीवरच्या उड्या, बेडूक उड्या इत्यादी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे वरिष्ठ विस्तार अधिकारी शिल्पा दास आणि बिर्ला कार्बन युनिट हेड रविंद्र रघुवंशी यांच्यासह विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### वडगाव शाळेच्या विद्यार्थ्यांचा दबदबा

**रसायनी** : राजिप शाळा तळवली येथे पार पडलेल्या माजगाव केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत वडगाव शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक बक्षिसे जिंकूल आपला दबदबा कायम ठेवला आहे. यावेळी १९ पैकी ८ प्रथम, १९ पैकी २ द्वितीय तर १९ पैकी ४ तृतीय अशा १५ पारितोषिकांवर वडगाव शाळेच्या मुलांनी नाव कोरले आहे. या स्पर्धांसाठी मुख्याध्यापक सुभाष राठोड, सह शिक्षक वैजनाथ जाधव, पदवीधर विषय शिक्षिका मयुरी धायगुडे, स्वयं सेवक संकेत काठोळे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या अंगी क्रीडा संस्कृती रुजणेखूप आवश्यक आहे. आज केंद्रातील स्पर्धांमधून सर्वाधिक बक्षिसे जिंकत वडगाव शाळा अव्वल ठरली. हे सर्व श्रेय शिक्षकांना व विद्यार्थ्यांच्या जिद्दीला जाते, असे प्रतिपादन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सुभद्रा दळवी यांनी केली.

# डब्ल्यूपीएलची थरारक सुरूवात

## ■ रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूची विजयी सुरूवात; गतविजेत्या मुंबईचा पराभव

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

महिला प्रीमिअर लीग २०२६चा चौथा हंगाम शुक्रवार, दि.९ जानेवारी पासून सुरू झाला आहे. यावेळी या चौथ्या हंगामातील पहिल्याच सामन्यात चुरस पाहायला मिळाली. या सामन्यात मुंबई इंडियन्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन माजी विजेते संघ समोरासमोर आले होते. त्यानिमित्ताने हरमनप्रीत कौर व स्मृती मानधना या दोन स्टार खेळाडू एकमेकींविरुद्ध उभ्या राहिल्या होत्या. परंतु, दोघींनाही खास कामगिरी करता आली नाही. मुंबईच्या संघाने आरसीबी समोर १५५ धावांचे लक्ष ठेवले होते. हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगतदार झाला. मुंबईने यापूर्वी फक्त एकदाच १५५ किंवा त्यापेक्षा कमी धावांचा यशस्वी बचाव केला आहे. २०२५ च्या अंतिम सामन्यात दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध त्यांनी १५० धावांचा बचाव करून



जेतेपद पटकावले होते. परंतु, या सामन्यात गतविजेत्या मुंबई संघाला हंगामातील पहिल्याच सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला.

या सामन्यात आरसीबीने नाणेफेक जिंकून मुंबई इंडियन्सला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रीत केले. यावेळी मुंबईकडून सलामीवीर एमेलिया केर आणि गुनालन कमालिनी या दोघी मैदानात उतरल्या. मात्र, आरसीबीची गोलंदाज लॉरेन बेलने सुरुवातीच्या २ षटकांत फक्त १ धाव देत मुंबईवर दडपण निर्माण केले. त्यानंतर पाचव्या षटकात एमेलिया केर (४) हिला बाद करून बेलने आरसीबीला पहिले यश मिळवून दिले. हिली मॅथ्यू आजारी असल्याने या सामन्याला ती मुकली. त्यामुळे मुंबई संघाला तिची उणीव जाणवली. त्यानंतर नॅडीने डे क्लेर्क हिने नॅट शिव्हर ब्रंट (४) व कर्णधार हरमनप्रीत कौर (२०) यांना स्वस्त्यात माघारी परतवले. दरम्यान, गुनालन कमालिनी (३२) चांगली फटकेबाजी करत होती; परंतु, श्रेयांका पाटीलने तिला बाद केले. त्यानंतर निकोला केरी व संजीवन सजना यांनी मुंबईच्या डावाला आकार दिला आणि मुंबई ने १५ षटकांत १०० धावा फलकावर चढवल्या. यावेळी केरी व सजना यांनी ४९ चेंडूंत ८२ धावांची भागीदारी केली. मात्र, १८व्या षटकात डे क्लेर्कने ही जोडी तोडली. सजना २५ चेंडूंत ७ चौकार व १ षटकारासह ४५ धावांवर झेलबाद झाली. त्यानंतर निकोला केरीने ४ चौकारांसह ४० धावा केल्या आणि मुंबईने २० षटकांत ६ बाद १५४ धावा धावफलकावर लावल्या. यावेळी आरसीबीच्या डे क्लेर्कने सर्वाधिक चार बळी घेतले. तर, लॉरेन बेल व श्रेयांका पाटील यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

मुंबई इंडियन्सने दिलेल्या लक्षाचा पाठलाग करताना आरसीबीला स्मृती मानधना आणि ग्रेस हॅरिस यांनी आक्रमक सुरूवात करून दिली. त्यांनी ३.५ षटकांत ४० धावा फलकावर चढवल्या. मात्र, स्मृती १८ धावांवर झेलबाद झाली. त्यानंतर १२ चेंडूंत २५ धावा करणारी हॅरिस देखील बाद झाली. राधा यादव (१) व रिचा घोष (६) या देखील स्वस्त्यात बाद झाल्या. त्यामुळे मुंबईले आरसीबीची मोठी कोंडी केली. यावेळी आरसीबीचा निम्मा संघ ६५ धावांत तंबूत परतला होता. परंतु, नॅडीने डे क्लेर्क व अरुंद्धती रेड्डी यांनी संघर्ष केला आणि ४९ चेंडूंत अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली. त्यांनी २४ चेंडूंत ३८ धावांचा पाठलाग करताना १७ व्या षटकात निकोला केरीच्या फुलटॉस चेंडूवर अरुंद्धतीने उत्तुंग फटका खेचला अन् सीमारेषेवर एमेलिया केरने तो टिपला. अरुंद्धती २० धावांवर बाद झाली आणि डे क्लेर्कसह तिची ५२ धावांची भागीदारी संपुष्टात आली. त्याच षटकाच्या शेवटच्या चेंडूवर श्रेयंका पाटील (१) ही देखील बाद झाली. त्यानंतर आरसीबीला जिंकण्यासाठी ६ चेंडूंत १८ धावा हव्या असताना डे क्लेर्कने तिसऱ्या व चौथ्या चेंडूवर अनुक्रमे ६ व ४ धावा चोपल्या आणि अर्धशतक पूर्ण केले. पाचव्या चेंडूवर षटकार खेचून १ चेंडू २ धावा असा सामना जवळ आणला. तिने चौकार खेचून ३ गडी राखून आरसीबीला थरारक विजय मिळवून दिला. यावेळी क्लेर्क ४४ चेंडूंत ७ चौकार व २ षटकारांसह ६३ धावांवर नाबाद राहिली.

# महाराष्ट्र संघाचे कांस्यपदकावर समाधान

**। दीव । क्रीडा प्रतिनिधी ।**

खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सागरी जलतरण, कबड्डी व सॉकरमध्येही कांस्यपदकांची लयलुट केली आहे. सागरी जलतरणात साताऱ्याच्या दिक्षा यादवचे रौप्यपदक अवघ्या ७ दशांश सेकंदाने हुकले. तर, पुरूषांच्या बीच कबड्डीत केवळ ३ गुणांनी महाराष्ट्र संघाला उपांत्य फेरीत पराभव स्वीकारावा लागला.



दीवमधील अरबी समुद्रात सकाळच्या सत्रात १० कि.मी. सागरी जलतरणाचा थरार रंगला होता. महिलांच्या गटात सुरूवातीपासून महाराष्ट्राच्या २० वर्षीय दिक्षा यादवे मुसंडी मारली होती. परंतु, दुसऱ्या फेरीत ती मागे पडली. अखेरच्या टप्प्यात २.४८.०४ वेळ नोंदवून तीने कांस्यपदकाचा पल्ला गाठला. त्यामुळे अवघ्या ७ दशांश सेकंदाने कर्नाटकच्या असरा सुधीरने रौप्यपदक तर २.४६.३४ वेळेत कर्नाटकच्याच अश्मिता चंद्राने सुवर्णपदकावर नाव कोरले. गतवर्षी याच प्रकारात दिक्षाने सुवर्णपदकाला गवसणी घातली होती. साताऱ्यातील दिक्षा ही पुण्यातील शासनाच्या क्रीडा प्रबोधिनीत सराव करते. खेलो इंडिया विद्यीपीठ स्पर्धा, खेलो इंडिया युवा स्पर्धा तर खेलो इंडिया बीच स्पर्धेत १६ पदके जिंकण्याचा पराक्रम तीने केला आहे. महाराष्ट्रातील विजेत्यांची भेट घेत पथकप्रमुख नवनाथ फडतरे यांनी अभिनंदन केले आहे.

घोघला समुद्र किनाऱ्यावर रंगलेल्या बीच सॉकर मैदानात महाराष्ट्राच्या मुलांनी साखळी लढतीत चमकदार कामगिरी करत उपांत्य फेरीत मुसंडी मारली होती. परंतु, उपांत्य लढतीत बलाढ्य केरळकडून १६-१ गोलने महाराष्ट्र पराभूत झाला. या कामगिरीमुळे सलग दुसऱ्या वर्षी कांस्यपदकावर महाराष्ट्राला समाधाव मानावे लागले. त्यानंतर बीच कबड्डीतील पुरूषांची महाराष्ट्र विरूद्ध हरियाणा लढत लक्षवेधी ठरली. पूर्वार्धात अभिषेक गुंगेसह सुरज दूंदळे यशस्वी चढाय्या करीत लढतीत चुरस कायम राखली होती. पूर्वार्धात १५ -१७ गुणांनी हरियाणा संघ आघाडीवर होता. त्यामुळे हीच आघाडी निर्णायक ठरली. मात्र, उत्तरार्धात तुल्यबळ खेळाचे प्रदर्शन करीत शेवटच्या मिनिटापर्यंत ३०-३० बरोबरी करण्यात महाराष्ट्र यशस्वी ठरला होता. शेवटच्या मिनिटाला हरियाणाने यशस्वी चढाई करीत महाराष्ट्राला ३ गुणांनी पराभूत करीत ३३-३० गुणांनी बाजी मारली. तर, महिलांच्या उपांत्य सामन्यात राजस्थानकडून महाराष्ट्राला ५६-२८ गुणांनी पराभूत व्हावे लागले. उपांत्य फेरीतील अपयशामुळे महाराष्ट्राच्या दोन्ही संघाला कांस्यपदकावरच खेलो इंडिया मोहिमाचा समारोप करावा लागला.



## महाराष्ट्रासाठी नेत्रदीपक कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

हैदराबाद येथे नुकतीच २६वी सिकाई राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्रासाठी खेळणाऱ्या रायगड व ठाण्याच्या खेळाडूंनी ५ रौप्य व १ कांस्यपदक पटकावून राष्ट्रीय स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. या स्पर्धेत अठरा वर्षाखालील गटात शिव हिलम व शादाब खान यांनी रौप्यपदक पटकावले. तर, यश शिंदे याने कांस्यपदक पटकावले. अठरा वर्षांवरील वरिष्ठ गटात शुभम नखाते, सौरभ भगत व परमेश केठवत यांनी रौप्यपदक पटकावले. या सर्वांना विजय तांबटकर, प्रियंका गुंजाळ व इम्तियाज खान यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले. तसेच, महाराष्ट्र सिकाई असोसिएशन अध्यक्ष मजर खान व सचिव रवींद्र गायकी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंचे महाराष्ट्रभरातून खूप कौतुक होत आहे.



## राष्ट्रीय स्पर्धेसाठी काव्याची निवड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय आइस-स्टॉक स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातून २४ खेळाडूंची निवड झाली आहे. ही स्पर्धा १६ वर्षाखालील, १९ वर्षाखालील आणि खुला गट अशा तीन गटांत होणार आहे. या राष्ट्रीय स्पर्धेसाठी बदलापूर येथील कार्मेल शाळेची विद्यार्थिनी काव्या पेरणे हिची निवड झाली आहे.

आईस स्टॉक असोसिएशन आणि आइस स्टॉक फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने राष्ट्रीय आइस-स्टॉक स्पर्धा भारवली जात आहे. यावेळी राज्याची निवड चाचणी स्पर्धा पुणे-हडपसर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेतुन राज्याचा संघ निवडला गेला. यावेळी नेरळ येथील काव्या संतोष पेरणे हीची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ती रायगड जिल्हा संघातून खेळते. तिने राज्य स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याने तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ही स्पर्धा दि.२३ ते २५ जानेवारी या कालावधीत जम्मू काश्मीर मधील गुलमर्ग येथे होणार असून स्पर्धेसाठी १६ वर्षाखालील गट, १९ वर्षाखालील गट आणि खुल्या गटात पुरुष आणि महिला अशी हि स्पर्धा होणार आहे. राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्यातून २४ जणांचा संघ सहभागी होत आहे.

## अवनी कोळीचा ‘सुवर्ण’वेध

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंज ६८वी राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा दि.१६ डिसेंबर ते ५ जानेवारी दरम्यान दिल्ली येथे पार पडल्या. या स्पर्धेत राष्ट्रीय शॉटगन डबल



ट्रॅप ज्युनिअर वुमन टीम व यूथ वुमन टीममध्ये अवनी कोळी हिने दोन सुवर्णपदक व वैयक्तिक ज्यू अँड युथमध्ये दोन कांस्यपदक मिळवले. तसेच, कार्तिकी देवळेकर व वरा देवळेकर यांनी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत विख्यात नेमबाज रिनॉन्ड शूटर ही पदवी संपादन केली. या तिघी जणी सिद्धांत रायफल क्लबच्या मेंबर आहेत. त्यांचे प्रशिक्षक रॅलस्टॅन कोईलो यांच्याकडे अवनी कोळी प्रशिक्षण घेत आहे. तर, कार्तिकी आणि वरा या दोघी बहिणी मोहणिश हिरवे यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण बालेवाडी येथील शूटिंग रेंज वर घेत असतात.

# आई एकविरा संघाला विजेतेपद

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील कुंभारपाडा, तेलीपाडा व मधीलपाडा ग्रामस्थ मंडळाच्यावतीने केटीएम प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे अजिंक्यपद आई एकविरा ट्रान्सपोर्ट क्रिकेट संघाने पटकाविले. ही क्रिकेट स्पर्धा चिरनेर येथील मातोश्री मैदानावर दि.३ व ४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ८ संघानी भाग घेतला होता.



या स्पर्धेत अंतिम सामना आई एकविरा ट्रान्सपोर्ट व वंदन सेवेन स्टार क्रिकेट या संघात रंगला. या अटितटीच्या समान्यात आई एकविरा संघाने केटीएम प्रिमियर लिगचे अंजिक्यपद पटकावले. त्यांना २० हजार रुपये रोख व आकर्षक चषक देण्यात आले. तर, वंदन सेवेन स्टार क्रिकेट संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. त्यांना १५ हजार रुपये रोख व आकर्षक चषक प्रदान करण्यात आले. या स्पर्धेमध्ये अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या यंग गटातील विवेक हातनोलकर याला मालिकावीर म्हणून, तर फोर्टी प्लस गटातील रुपेश नारंगीकर यालाही मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले. तसेच, उत्कृष्ट फलंदाजाचा मानही वंदन सेवन स्टार संघाचा विवेक हातनोलकर याला मिळाला. तर, गोलंदाज म्हणून रुपेश नारंगीकर आणि क्षेत्ररक्षक म्हणून दिनेश मोकल सन्मानाचे मानकरी ठरले.

या क्रिकेट स्पर्धेसाठी उद्योगपती राजेंद्र खारपाटील व सरपंच भास्कर मोकल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तर, अलंकार परदेशी, प्रफुल्ल खारपाटील, पद्माकर फाफेरकर, निकिता नारंगीकर, नीलम चौलकर, सचिन घबाडी, अर्जुन मोकल, पद्माकर मोकल, प्रशांत खारपाटील, राजू चिर्लेकर, समीर डुंगीकर, विकास नारंगीकर, गणेश म्हात्रे, विद्या कारेकर, निनाद खारपाटील, नितीन नारंगीकर, चेतन चौलकर, सुरेश म्हात्रे, नितीन म्हात्रे, संतोष चौलकर, जितेंद्र नारंगीकर व चालक मोकल यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी हजेरी लावून स्पर्धेला शोभा आणली.

## अंतिम सामन्यात प्रतिस्पर्ध्यांना चारली धूळ | अमर हिंदच्या मैदानात लंगडीचा थरार

# क्रीडा महोत्सवात ठाणेकरांचा डंका

**। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।**

मुंबईतील दादरच्या अमर हिंद मंडळाचा शालेय क्रीडा महोत्सव दणक्यात सुरु आहे. कै. उमेश शेणॉय यांच्या स्मरणार्थ आंतरशालेय लंगडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेने दादरकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. अटीतटीच्या लढतीत आपल्या चपळाईच्या आणि धोरणी खेळाच्या जोरावर ठाण्याच्या ज्ञान विकास विद्यालय या संघाने मुले आणि मुली अशा दोन्ही गटांत वर्चस्व गाजवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.



या स्पर्धेत एकूण २३ शाळांनी सहभाग नोंदवला होता. त्यात १२ मुली व ११ मुलांनी समावेश होता. या स्पर्धेचे उद्घाटन माजी राज्यस्तरीय खेळाडू निकेश धुरी यांच्या हस्ते पार पडले. उद्घाटन प्रसंगी निकेश धुरी यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. अमर हिंद मंडळाच्या या यशस्वी आयोजनामुळे मुंबईतील शालेय क्रीडा संस्कृतीला पुन्हा एकदा नवी उभारी मिळाल्याचे दिसून आले. तर, पारितोषिक वितरण समारंभात प्रसिद्ध दंतचिकित्सक आणि ॲथलेटिक्स खेळाडू डॉ. मनोज मुगुदुम यांची उपस्थिती खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरली.

या लंगडी स्पर्धेत मुलींच्या अंतिम सामन्यात ज्ञान विकास विद्यालय ठाणे विरुद्ध श्री गणेश विद्यालय वडाळा (मराठी माध्यम) यांच्यात जबरदस्त टक्कर पाहायला मिळाली. यावेळी ज्ञान विकास विद्यालयाने श्री गणेश विद्यालयावर २७-१६ असा ११ गुणांनी विजय मिळवला. एकेकाळी तगड्या असलेल्या श्री गणेश विद्यालयाला हा पराभव जिव्हारी लागला. ज्ञान विकासच्या समृद्धी कदम, रेणूका कंक आणि श्रावणी मोरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तर, मुलांचा अंतिम सामना अत्यंत थरारक झाला. ज्ञान विकास विद्यालय ठाणे विरुद्ध सह्याद्री विद्यामंदिर भांडुप या सामन्यात प्रत्येक मिनिटाला उत्कंठा वाढत होती. शेवटी ज्ञान विकास विद्यालयाने सह्याद्री विद्यामंदिरचा २७-२५ असा २ गुणांनी पराभव केला. ज्ञान विकासच्या साईराज बैलकर, श्रेयस धनावडे, सार्थक सकपाळ आणि साहिल शिंदे यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. डॉ. मनोज मुगुदुम यांनी विजेत्यांचे कौतुक करताना खेळाडूंच्या जिद्दीला दाद दिली.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)